# नगरपरिषद सातारा

# लेखा परीक्षण अहवाल

# 2013-2014

सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा,सातारा

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा,जिल्हा परिषद विस्तारी इमारत, दुसरा मजला, सातारा

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नगरपरिषद सातारा यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**सातारा नगरपरिषद सातारा जिल्हा सातारा**

**लेखापरीक्षण अहवाल सन 2013-2014**

---

जा.क्र;स्था. 2/ब/ले.प.अ/न.प.सातारा/2013-14/पूणे/1050

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे
लेखाकोष भवन,तिसरा मजला,
दिनांक : 25/08/2015

प्रेषक,

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे

प्रति,

मा. अध्यक्ष,
सातारा नगपरिषद सातारा,
जिल्हा सातारा.

संदर्भ:- या कार्यालयाचे सुचनापत्र क्र.18/ब/जि.प.पं.स.न.प.लेप/2013-14/सातारा/299 दि.25/6/2014

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सातारा नगरपरिषदेचे सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण श्री. शैलेश हि. मोरे, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा व श्री. रा.दि. सादिगले, लेखापरीक्षा अधिकारी, श्री. ज्ञा.ना.शिंदे, श्री. मा.स.शिंदे, वरीष्ठ लेखापरीक्षक, श्री. मि. वि, जगताप, श्री. पी.व्ही. झाल्टे, श्री. सु.पु. वीर, श्री. यो. शा. शिंदे कनिष्ठ लेखापरीक्षक यांनी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे नियम 4 अन्वये दिनांक 08/04/2015 ते 26/05/2015 या कालावधीत पूर्ण केले. व त्याचे चर्चा करुन अंतिमीकरण श्री. सतीश तडकसे, सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक 24/08/2015 रोजी केले आहे.

लेखापरिक्षण कालावधीत खालील प्रमाणे अधिकारी व पदाधिकारी नगरपालिकेचा कारभार पहात होते.

| अ क्र | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | सौ. सुजाता सागर राजेमहाडीक | अध्यक्ष | 1/4/2013 ते 31/3/2014 |
| 2 | श्री. अभिजीत सतीश बापट | मुख्याधिकारी | 1/4/2013 ते 31/3/2014 |

चर्चा केली

चर्चा केली

अध्यक्ष
सातारा नगरपरिषद,सातारा

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....1

I PART I : भाग १ ....2

मागील लेखा परीक्षण अहवाल ....3

PART II ....7

**कलम ९ अ खालील आक्षेप** ....8

1 कर निर्धारण नोंदवहीवर नवीन मालमत्ता नोंदविण्यास झालेल्या विलंबाबाबत ....9

2 अल्पसंख्यांक निधी गुंतवणूकीबाबत. ....10

3 अंशत: प्रदान देयकांबाबत. ....11

4 वार्षिक लेखे प्रसिध्दी व सादर करणेबाबत. ....13

5 ई-निविदा कार्य प्रणाली लागू करण्याबाबत. ....14

6 दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत. ....15

7 आर्थिक गणना 2013 खर्चाबाबत. ....16

8 मागासवर्गीय कल्याण सदरी खर्चाबाबत ....17

9 वाहन दुरुस्ती खर्चाबाबत. ....18

10 नगरपरिषद वाहनांना स्पेअर पार्ट्स पुरविणे निविदेबाबत व पूनर्प्रत्ययी आदेशाबाबत. ....21

11 क्रिडा विषयक बाबीवरील खर्चाबाबत. ....22

12 नगरपरिषद कार्यक्षेत्रासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द करणेबाबत. ....23

13 देयक नमुन्यांबाबत व लेखाशिर्ष बदल केल्याबाबत. ....25

14 आयकर उद्‌गम करकपात विलंबापोटी दंड व्याज आकारणीबाबत. ....27

15 जयंती उत्सव साजरे करणे- खर्चाबाबत ....30

16 श्रीमंत छत्रपती शाहू कलामंदीर येथे रंगकाम करणे ....31

17 सि.स.नं. 82अ पंताचा गोट येथे चार सीट्स सार्वजनिक संडास बांधणे ....33

18 वॉर्ड क्रमांक 9, 101 कामाठीपुरा येथील सार्व. संडासची दुरुस्ती करणे. ....34

19 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजना कामासाठी TRANSIT कॅम्प तयार करणे कामी जागा लेवल, माती वाहतुक करणे. ....35

20 वॉर्ड क्रमांक 32 पेठ शनिवार बागवान घर ते शेख घर अखेर गटर करणे ....37

21 नळ पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत ....39

22 हायप्रेशर सोडियम व्हेपर दिवे खरेदी खर्चाबाबत. ....40

23 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत (IHSDP) योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाबाबत व इतर पायाभूत सुविधा खर्चाबाबत. ....43

24 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत....51
25 प्रभाग क्रमांक 8 मौला अल्ली दर्गा ते डोईफोडे दवाखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे....52
26 जुना वार्ड क्र. 23 ते 26 ते 28 ते 33 मधील रस्ते पिर्चींग करणे....54
27 वॉर्ड क्रमांक 22 पेठ भवानी सोमवार यादोगोपाळ अंतर्गत रस्ते डांबरी पॅचींग करणे....55
28 प्रभाग क्रमांक 6 पेठ मंगळवार गवई विठ्ठल मंदीर ते सोहनीची गिरणी ते राजाजे चौक अखेर डांबरीकरण करणे 56
29 पेठ गुरुवार सि.स.नं. 271/272 येथे गेट बसविणे व ग्रीलवर्क करणे....58
30 सदर बाझार डॉ. लिमये हॉस्पीटल ते घेवारी हॉस्पीटल प्लॉट नं. 32 अखेर रस्ता डांबरीकरण करणे....60
31 आदालत वाडा ते शंकराचार्य मठ ते माऊली मंदीर कमान अखेर रस्ता डांबरीकरण करणे व संरक्षक भिंत बांधणे 61
32 वॉर्ड नं. 3 रामकृष्ण कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे....62
33 जंतूनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत....64
34 शासन परिपत्रक दि. 5 मे 2010 नुसार सुधारीत संरचनेनुसार वेतननिश्चिती न केलेबाबत....67
35 न्यायालयीन प्रकरणांबाबत....69
36 वाहन वापरावरील जादा झालेल्या खर्चाबाबत....70
37 एस एल ओ नोंदवही न ठेवलेबाबत....72
38 आर्थिक स्थितीवरील अभिप्राय....72
39 अंदाजपत्रकातील कमी जादा खर्चाबाबत....74

**कलम ९ ब खालील आक्षेप....78**

40 पावती पुस्तके साठा नोंदवहीतील अनियमिततांबाबत....79
41 करांची मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत....80
42 नवीन चतुर्थ वार्षिक कर निर्धारण सुची तयार करणेबाबत....81
43 UIDSSMT योजनेसाठी न.पा.हिस्सा (लोकवर्गणी )भरणेबाबत ....82
44 मंगल कार्यालय भाडे तत्वावर देण्याबाबत....85
45 भविष्य् निर्वाह निधी लेखांबाबत....86
46 अग्नीशामक करावाबत....89
47 पेठ मंगळवार श्री. राजू भोसले घर ते श्री राजे महाडीक घर अखेर 2" GI PIPE LINE टाकणे....90
48 नगरपालिकेने घेतलेल्या कर्जाबाबत....91
49 रस्ता खुदाई नुकसान भरपाई रकमेबाबत....92
50 नगरपालिका शिक्षण मंडळाकडील शाळांना सेमी इंग्लीश व प्ले ग्रुप शिक्षक/ मदतनीस नियुक्तीबाबत....94
51 जलतरण तलाव बंद असल्याबाबत....99
52 अनामत रकमा परताव्याबाबत....101

53 देयकांमधील कपात रकमा व उपप्रमाणकांबाबत. ....105
54 प्रलंबित तसलमात रकमांबाबत. ....108
55 प्रभाग क्रमांक 1 पेठ सदरबाझार लोणंद रस्ता ते थोटेघर अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण व बनसोडेवस्ती डांबरीकरण. ....109
56 वॉर्ड क्रमांक 11, पेठ रविवार येथील 8 सीट सार्वजनिक संडास पाडून नवीन 8 सीट संडास बांधणे ....111
57 वॉर्ड क्रमांक 32 पेठ गुरुवार 196ब श्री. सुतार घर ते 196 गुरुवार पालकर घर अखेर संरक्षक भिंत बांधणे.112
58 सिटी सर्वे नं. 101 कामाठीपुरा कोल्हाटी वस्ती येथे सामाजिक सभागृह बांधणे ....115
59 आय हॉस्पीटल ते कूपर बंगला ते सिम्बायोसिस हॉस्पीटल अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ....116
60 ठेव पावती वटविताना झालेल्या नुकसानीबाबत ....119
61 पोवई नाका ते जरंडेश्वर नाका या रस्त्यांपैकी पोवई नाका ते कॅनॉल पूल चेनेज(0 ते 1520 )या पहिल्या टप्प्याचे रुंदीकरण खडीकरण व डांबरीकरण करणे व रोड डिव्हायडर बांधणे ....120
62 पोवई नाका ते सिव्हिल हॉस्पीटल स्ट्रीट लाईट बसविणे ....122
63 प्रभाग क्र. 7(क) सर्वोदय कॉलनी सार्वजनिक संडास सि.स.नं. 124 रविवारपेठ येथे पाईप ड्रेन करणे....123
64 राजवाडा मोती तळे येथील गाळ काढणे....125
65 गुंठेवारी प्रकरणात प्रशुमन शुल्क व विकास शुल्क आकारणीबाबत कार्यवाही न केलेबाबत. ....126
66 कर वाढ व घट नोंदवहीबाबत. ....127
67 मालमत्ता करांच्या थकबाकी बाबत....128
68 भविष्य निर्वाह निधीची ठेव पावती मुदतीपुर्वी वटविल्याबाबत ....129
69 अनुदान नोंदवहीबाबत ....130
70 शासकीय विमा निधीची कपातीबाबत. ....131
71 अनधिकृत बांधकामांबाबत....133
72 वॉर्ड क्र. 1ते 39 मधील कचरा घंटागाडीने गोळा करण्याबाबत ....133
73 सेवापुस्तके व वेतनदेयकांमधील अनियमिततांबाबत....136
74 इमारत गाळा भाडे थकबाकी व भाडे निश्चितीबाबत. ....137
75 बाग सादील खर्चाबाबत. ....139
76 पेठ गुरुवार सि.स.नं. 344 येथे तळमजला येथे शॉपींग सेंटर बांधणे....141

**कलम ९ क खालील आक्षेप**....143

-------------- निरंक -------------- ....144

**कलम ९ ड खालील आक्षेप**....146

77 जाहिरात कराबाबत. ....147
78 शाहुकला मंदीर देखभाल व देखभाल दुरुस्ती खर्चाबाबत. ....148
79 नळ जोडणी गणना करणेबाबत. ....149

80 प्रदान धनादेश ताळमेळांबाबत. ....150
81 हातगाडया परवाना शुल्क वसुल न केलेबाबत. ....151
82 वृक्ष प्राधिकर निधीबाबत ....152
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....155

विवरणपत्रे व जोडपत्रे ....156

## विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32 | 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65 | | 77, 78, 79, 80, 81 |
| सामान्य प्रशासन | 34 | 73 | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | | 76 | | |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | 37 | | | |
| लेखा विभाग | 38, 39 | 68, 69, 70, 71 | | |
| कर निर्धारण व संकलन | | 66, 67 | | |
| आरोग्य | 33 | 72 | | |
| भूमी व मालमत्ता विभाग | | 74 | | |
| वाहन विभाग | 36 | | | |
| विधी विभाग | 35 | | | |
| पर्यावरण किंवा प्रदूषण नियंत्रण विभाग | | | | 82 |
| उद्यान विभाग | | 75 | | |

नगरपरिषद सातारा

# I Part I : भाग १

## प्रलंबित परिच्छेदांचे विवरणपत्र

खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद प्रलंबित असून त्याबाबत मा. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार करणेत येत आहे.

| अ. नं. | लेखापरीक्षणाचे वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण परिच्छेद |
|---|---|---|---|
| 1 | 1972/73/74 | 8 | 1 |
| 2 | 1976/77/78 | 7, 62 | 2 |
| 3 | 1978/79/80 | 7, 33, 83 | 3 |
| 4 | 1980/81/82 | 5, 26, 34, 35, 37, 81, 82 | 7 |
| 5 | 1982/83/84 | 8, 32, 37, 39, 44, 53, 94, 106 | 8 |
| 6 | 1984/85/86 | 8, 17, 18 | 3 |
| 7 | 1986/87 | 13, 14, 15, 66, 82, 102 | 6 |
| 8 | 1987/88 ते 1989/90 | 10, 17, 25, 27, 38, 51, 145, 150, 188, 197, 215 | 11 |
| 9 | 1990/91/92 | 7, 26, 66, 102 | 4 |
| 10 | 1992/93 | 22, 26, 27, 32, 45, 70, 71, 87, 94, 106 (2) | 10 |
| 11 | 1996/97 ते 1998/99 | 9, 10, 5, 17, 23, 25, 30, 31, 32, 33, 47, 48, 58, 60, 93, 104, 109, 121, 145, 147, 151, 168, 187, 198, 200 | 25 |
| 12 | 1999/2000 ते 2000/01 | 16, 44, 55, 64, 69, 71, 175, 176, 180, 193, 206, 221 | 12 |
| 13 | 2001/02 ते 2002/03 | 5, 22, 42, 44, 46, 47, 48, 54, 92, 97, 103, 105, 106, 111, 115, 117, 128 | 17 |
| 14 | 2003/04 | 6, 16 (ब), 18, 22, 44, 46, 47, 48, 49, 55, 58, 61, 70, 77, 82, 84 | 16 |
| 15 | 2004/05 | 14, 17, 18, 24, 30, 32, 34, 36, 50, 56, 57, 65, 94, 95, 96, 97 | 16 |
| 16 | 2005/06 | 5, 19, 20, 23, 25, 38, 39, 40, 43, 45, 46, 62, 76, 81, 89, 6 | 16 |
| 17 | 2006/07 | 4, 6, 8, 9, 11, 14, 18, 24, 25, 33, 34, 38, 39, 44, 45, 46, 47, 49, 51, 55, 60, 61, 63, 64, 66, 67, 69, 71, 73, 74, 75, 77, 78, 79, 81, 82, 83, 84, 86, 87, 92, 93, 94, 95, 99, 100 | 46 |
| 18 | 2007/08 | 3, 4, 5, 6, 7, 8, 11, 13, 17, 19, 22, 29, 36, 37, 38, 40, 41, 47, 58, 59, 60, 61, 62, 63, 65, 72, 73, 75, 76, 83, 84, 86, 87, 88, 90(ब), 91, 93, 98 | 38 |
| 19 | 2008/09 | 4, 5, 6, 7, 8, 10, 11, 12, 13, 15, 16, 17, 22, 24, 26, 34, 35, 41, 43, 44, 45, 46, 47, 52, 53, 55, 57, 63, 64, 65, 66, 71 | 32 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20 | 2009/2010 | 7, 8, 9, 11, 14, 16, 17, 20, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 36, 39, 40, 42, 43, 46, 47, 48, 51, 52, 54, 55, 56, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 72, 73, 74, 75 | | 45 |
| 21 | 2010/2011 | 4, 5, 6, 7, 8, 12, 14, 16, 18, 19, 20, 21, 23, 24, 28, 33, 34, 35, 36, 37, 40, 45, 47, 54, 58, 61, 62, 66, 67, 69, 71, 72, 73, 74, 79 | | 35 |
| 22 | 2011-2012 | 1 ते 88 | | 88 |
| 23 | 2012 - 2013 | 1 | आर्थिक स्थितीबाबत. | |
| | | 2 | पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत. | |
| | | 3 | अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा कमी जादा खर्चापेक्षा | |
| | | 4 | लेखे दुहेरी नोंद पध्दतीत न ठेवलेबाबत. | |
| | | 5 | एस. एल. ओ. नोंदवहीबाबत | |
| | | 6 | वार्षिक लेख्याबाबत. | |
| | | 7 | अंध, अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च न केलेबाबत. | |
| | | 8 | भांडार विभागाकडील न. नं. 1 शिल्लक कोरी कर वसुली पावती पुस्तकाचा साठा हिशोब बाबत. | |
| | | 9 | करांची मागणी नोंदवही तसेच करांची पावती पुस्तके विहित नमुन्यात न ठेवलेबाबत. | |
| | | 10 | सार्वजनिक बांधकाम विभागासाठी लॅपटॉप व सर्व ॲक्सेसरीज व सॉफ्टवेअर खरेदीबाबत. | |
| | | 11 | प्रभाग क्र. 1 (ब) बनसोडे वस्ती येथील महिलांचे शौचालय दुरुस्त करणे. | |
| | | 12 | जंतुनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत. | |
| | | 13 | ब्लीचिंग पावडर खरेदीतील अनियमिततेबाबत. | |
| | | 14 | कोर्ट केसेस नोंदवही व वकील फी अदाईबाबत. | |
| | | 15 | वाहन दुरुस्ती खर्चाबाबत. | |
| | | 16 | न. पा. वाहनांना स्पेअर पार्टस पुरविणे निविदेबाबत व पुर्नप्रत्ययी आदेशाबाबत. | |
| | | 17 | अग्निशमन कर वसुल न केलेबाबत. | |
| | | 18 | प्रभाग क्र. 4 ब पेठ करंजे 24 बीट सार्वजनिक शौचालय ते पालखी मार्ग अखेर पाईप ड्रेनेज करणे. | |
| | | 19 | स्टेअर केस प्रिमियमची आकारणी कमी दराने केलेबाबत. | |
| | | 20 | रयत शिक्षण संस्था ते पोवई नाका अखेर संरक्षक भिंत रस्ता दुभाजक विद्युतीकरण व फूटपाथ करणे. | |
| | | 21 | सोनगाव कचरा डेपो येथे जेसीबी मशीन भाडयाने पुरविणेबाबत. | |
| | | 22 | शिवम कॉलनी अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | |
| | | 23 | ऐक्य कॉर्नर ते जाधव घर ते ऐक्य कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 24 | वाहन वापरावरील जादा झालेल्या खर्चाबाबत. | |
| | | 25 | औषध खरेदीबाबत (दवाखाना). | |
| | | 26 | कामगार विमा, गौण खनिज, मुद्रांक शुल्क व नामफलक शुल्क रक्कम वसूल न केलेबाबत. | |
| | | 27 | पोवई नाका आयडीबीआय बँकेलगत बसस्टॉप (पश्चिम बाजू) जवळ कंपाऊंड वॉल बांधणे. | |
| | | 28 | तांत्रिक छाननी फी बाबत. | |
| | | 29 | वाहन क्र. एम एच 11 ए बी 1000 च्या लॉगबुकास इंधनाची नोंद नसले बाबत. | |
| | | 30 | जी. आय. लाईन टाकणे, दुरुस्ती व इतर बांधकामाबाबत. | |
| | | 31 | प्रभाग 1 ते 39 मधील कचरा घंटागाडीने गोळा करणेबाबत. | |
| | | 32 | वार्ड क्र. 35 पेठ शनिवार सि. स. नं. 1000 शिंदे घर ते कुलकर्णी घर रस्ता डांबरीकरण करणे. | |
| | | 33 | कास डॅम इंटकवेल येथे नवीन लेवल पट्टी व लोखंडी दरवाजा बसविणे. | |
| | | 34 | सातारा वाढीव पाणी पुरवठा योजना येथील अशुध्द पाणी उपसा केंद्रातील मोटर दुरुस्ती खर्चाबाबत. | |
| | | 35 | घंटागाडी मक्तेदारास जादा दराने अदाई केलेबाबत. | |
| | | 36 | डंपिंग टिपर ट्रक वाहन खरेदीबाबत. | |
| | | 37 | नळ जोडणी गणना करणेबाबत. | |
| | | 38 | करातील वाढ व घट नोंदवहीबाबत. | |
| | | 39 | नगरपालिकेने घेतलेल्या कर्जाबाबत. | |
| | | 40 | मोबाईल टॉवर व केबल नेटवर्क बाबत. | |
| | | 41 | गुंतवणूक केलेल्या रक्कमेबाबत. | |
| | | 42 | विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेतलेबाबत. | |
| | | 43 | निविदा फॉर्म विक्रीबाबत. | |
| | | 44 | बांधकाम नोंदवहीबाबत. | |
| | | 45 | भविष्य निर्वाह निधीतील गुंतणूकीबाबत. | |
| | | 46 | वार्षिक वेतनवाढी मंजूरीबाबत. | |
| | | 47 | सेवा पुस्तकातील अनियमितताबाबत. | |
| | | 48 | प्रलंबित तसलमात रक्कम वसुलीबाबत. | |
| | | 49 | बृहतपत्रकातील तफावतीबाबत (भविष्य निर्वाह निधी). | |
| | | 50 | भविष्य निर्वाह निधी अग्रीम बाबत. | |
| | | 51 | मुद्रांक लेखाबाबत. | |
| | | 52 | स्ट्रीट लाईट वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे ठेका कामाबाबत (विद्युत विभाग). | |
| | | 53 | सेवा पुस्तकातील रजेच्या लेख्यातील अनियमितताबाबत. | |
| | | 54 | जाहिरात कर वसुलीबाबत. | |
| | | 55 | हातगाडया लायसेन्स फी ची वसूली न केलेबाबत. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 56 | शिक्षण कर व रोजगार हमीकर भरणा रक्कमेबाबत. | |
| | | 57 | आरोग्य विभागाकडील ठेक्याने दिलेल्या विविध कामाबाबत. | |
| | | 58 | क्रीडा स्पर्धा खर्च अनियमिततेबाबत. | |
| | | 59 | घंटागाडीवर बिगारी नसलेने न. प.चे अप्रत्यक्षरित्या झालेल्या नुकसानीबाबत. | |
| | | 60 | खाजगी वॉटर टँकर खर्चाबाबत. | |
| | | 61 | शाहू कला मंदिर साफसफाई व विद्युत उपकरणे देखभाल दुरुस्ती खर्चाबाबत. | |
| | | 62 | संगणकाव्दारे कर जमा होत असता पावती पुस्तके दिल्याबाबत. | |
| | | 63 | इमारत भाडे , गाळा भाडे, जागा भाडे थकबाकी वसुलीबाबत. | |
| | | 64 | मत्ता दायित्व पत्रक व कराचे थकबाकी पत्रक रक्कमातील तफावतीबाबत. | |
| | | 65 | सुरक्षा ठेव अनामत बाबत. | 65 |
| | | | एकुण | 506 |

उपरोक्त परिच्छेदांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायात नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

नगरपरिषद सातारा

***1 कर निर्धारण नोंदवहीवर नवीन मालमत्ता नोंदविण्यास झालेल्या विलंबाबाबत***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

***लेखा शीर्ष :00 00 निधी***

***अनियमितता कलम : 9अ***

***नवीन मालमत्तेची माहीती कर वसूली विभागास दरमहा कळवली नाही. तसेच नवीन मालमत्तेची माहीती नगरविकास विभागाने कर वसूली विभागास उशिराने कळवली आहे.***

**लेखापरीक्षकाने** अर्धसमासपत्र क्र. 36 दिनांक 22/4/2015 अन्वये खालील परीच्छेदाबाबत उत्तर मागविले होते. मात्र **संबंधित संस्थेचे** अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) **नगरपालिका** सातारा चे (पाहणी पत्रक) कर निर्धारण नोंदवही, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 1971 नियम **नमुना** 43 **अन्वये** ठेवली आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक 2 नुसार एकूण 20 विभाग असून 30699 इतक्या एकूण **मालमत्ता आहेत**. तथापी सदर नोंदवहीत शेवटी मालमत्तेच्या निवासी - व्यावसायिक प्रकारानुसार एकत्रीत गोषवारा काढुन महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 नियम 75(1) नुसार अशा सर्व प्रभागांच्या नोंदवहयांचा एकत्रीत गोषवारा ठेवणे आवश्यक आहे.तथापि सातारा नगरपालिकेने अशी कार्यवाही कलेली नाही

2) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 नियम 75(6)अन्वये इमारतींना परीपुर्ती प्रमाणपत्र दिले असेल अशा त्या त्या महीन्यातील काम पुर्ण् झालेल्या इमारतींची माहीती दरमहा कर वसूली विभागास विहीत नमून्यामध्ये देणे आवश्यक आहे. 2/11/ 2012 रोजी पुर्ण झालेल्या इमारतींची माहीती जा.क्र. न.वि 3/559 दि. 19/9/2014 अन्वये नगरविकास विभागाने करवसूली विभागास कळवली आहे . परिशिष्ट क्र. 1 नुसार एकूण 85 इतक्या मान्यता सुमारे 1 ते 2 वर्षे विलंबाने कर आकारणी विभागाला अवगत झाल्या त्यानुसार इमारत पुर्ण झालेल्या दिनांकापासून कर लागू झाला .तथापि 1 ते 2 वर्षाच्या विलंबाची व्याज आकारणी करदात्याकडून करणे कर विभागास शक्य झाले नाही. तसेच सदर मिळकतींवर एक ते दोन वर्षानी विलंबाने आकारणी झाल्याने तेवढी कमी जमा कराची रक्कम नगरपालिकेस वेळेत विकास कामांवर खर्च करण्यास प्राप्त झाली नाही. एकूण मालमत्तांपैकी 10% मिळकतींची करआकारणी तपासली असता वाढ/घट नोंदवही ठेवलेली नाही. लेखापरीक्षण वर्षामध्ये एकूण 1217 इतक्या नवीन मालमत्तांची निर्मीती झाली आहे. तथापि फक्त काही मिळकतींनाच भोगवटा प्रमाणपत्र दिले गेले आहे. अशा एकूण 85 इतक्या मालमत्ता असून त्यावरील विलंब शुल्क (व्याज)आकारणी चे नगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

3) कर वसूली विभागाने देखील दरमहा कोणत्या नवीन मालमत्तांचे भोगवटा प्रमाणपत्रा दिले. याची माहितीची मागणी नगरविकास विभागाकडे करणे आवश्यक होते. तथापी तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच नगरपालिकेने वाढ-घट नोंदवही ठेवलेली नसल्यामुळे विलंबाने कार्यवाही झालेली आहे.

नगरपरिषद सातारा

नगरपालिकेच्या झालेल्या व्याजाची नुकसानीची परीगणना करून संबधित विभाग व जबाबदारी निश्चित करावी.
भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या मिळकतींची विनाविलंब कर आकारणी करणे आवश्यक आहे.

DATPVZM7101 (Ref No : 2, Hmm No : 36)

## *2 अल्पसंख्यांक निधी गुंतवणूकीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : अल्पसंख्यांक निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1519320.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1505142.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 14178.00/-

***ठेव पावती वटल्यानंतर बँकेत जमा झालेली रक्कम रोजकिर्दीत जमा सदरी नोंद न घेता लेख्याबाहेर ठेवली आहे. बँक खात्यात रक्कम कमी जमा केली आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमाससमापत्र क्र. 47 दि. 22/4/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) अल्पसंख्यांक निधी ठेव पावती क्रमांक 797507 ची दि. 8/6/2013 रु. 1514178/- अनुसार इंडीयन बँक शाखा सातारा येथे गुंतवणुक केली आहे. त्याची मुदत दिनांक 6/9/2013 अखेर होती. तथापि अल्पसंख्यांक निधीमधील पूर्ण झालेल्या कामाची देयके आदा करणेसाठी दिनांक 16/8/2013 रोजी ठेव पावतीचे रोखीकरण केले आहे व त्यावेळी नगरपरिषदेस व्याजासह एकूण रु. 1519320 मिळाली होती. दिनांक 16/8/2013 रोजी प्राप्त झालेली रक्कम रु. 1519320 नगरपरिषद निधी रोजकिर्दीस जमा सदरी नोंद करणे आवश्यक होते. तथापि नगरपरिषदेने रोखीकरणाच्या दिवशी अथवा लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत रोजकिर्दीत जमा नोंद केली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.32 नुसार दैनंदिन प्राप्त रकमा रोजकिर्दीस जमा नोंद घेणे आवश्यक असतांना तशी नोंद घेतली नसल्याने रक्कम लेख्याबाहेर राहिल्याचे दिसून येते. सदर बाब नियमबाहय असून त्याबाबत योगय ती सुधारणा होणे आवश्यक आहे.

2) वरील उपपरिच्छेद क्र. 1 नुसार दिनांक 16/8/2013 रोजी नगरपरिषदेच्या इंडियन बँक शाखा सातारा मधील खाते क्रमांक 4754444774 मध्ये रक्कम रु. 1519320 जमा होणे आवश्यक होते. तथापि बँकेने रक्कम रु. 1519320 जमा करणे ऐवजी रक्कम रु. 1505142 जमा केले आहेत व रक्कम रु. 14178 टीडीएस वजाती केलेली आहे. आयकर कायदा कलम 80 (P) नुसार स्थानिक स्वराज्य संथांना

आयकरातून सवलत असल्याने वजातीपोटी बँकेने रोखून ठेवलेली रक्कम रु. 14178 प्राप्त करुन घेऊन बँक खात्यात जमा झाल्याबाबत पुर्तता दाखवावी.

[illegible]

## 3 *अंशत: प्रदान देयकांबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 6080249.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6080249.00/-

***देय रक्कमेपैकी अंशतः प्रदान केले आहे. याच्या आवश्यकतेबाबत तपशील नमूद केला नाही. अंशतः व उर्वरीत प्रदान रकमांच्या नोंदी तपशीलासह केलेल्या नाहीत.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 51 दि. 7/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

सातारा नगरपरिषद सन 2013/14 लेखापरीक्षणा दरम्यान निवड महिन्यातील प्रमाणकांचे रेखांकन करीत असता, पुढील नमुद प्रमाणकांव्दारे देयकांच्या मूळ रकमे ऐवजी अंशत: प्रदान केले आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| 1851 | 30/10/2013 | 200000 | सुजित भोसले केसरकर पेठ पाईप ड्रेन करणे. देयकाची एकूण रक्कम रु. 422916 |
| 1826 | 30/10/2013 | 300000 | श्रीराज दिक्षीत शौचालय बांधणे. देयकाची एकूण रक्कम रु. 424328 |
| 2463 | 30/10/2013 | 500000 | श्री. ए.एस. देसाई भाजी मंडई विकसीत करणे. देयकाची एकूण रक्कम रु . 1525143 |
| 2474 | 5/2/2014 | 80249 | श्री. इलेक्ट्रीकल्स विद्युत दिवे पोल बसविणे देयकाची एकूण रक्कम रु . 380249 यापूर्वी रु. 300000 आदा केले आहेत. |
| 2494 | 5/2/2014 | 400000 | पुनम कन्स्ट्रक्शन अग्नीशमन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | केंद्र डांबरीकरण करणे. देयकाची एकूण रक्कम रु . 762765 |
| 2495 | 5/2/2014 | 100000 | हसन शेख कुपर कारखाना संरक्षक भिंत बांधणे. देयकाची एकूण रक्कम रु . 251503 |
| 2567 | 15/2/2014 | 150000 | सुजित भोसले फुटका तलाव ओढयास संरक्षक भिंत बांधणे. देयकाची एकूण रक्कम रु . 742625 |
| 2802 | 10/3/2014 | 150000 | सुरज जगताप रस्ता डांबरीकरण करणे. देयकाची एकूण रक्कम रु . 249616 |
| 3113 | 29/3/2014 | 200000 | चेअरमन कासाईदेवी मजूर सह. संस्था शाहू कला मंदीर दुरुस्ती करणे . देयकाची एकूण रक्कम रु . 322487 |
| 3117 | 29/3/2014 | 4000000 | पुनम कन्स्ट्रक्शन रस्ते डांबरीकरण करणे. देयकाची एकूण रक्कम रु . 6656807 |
| 3072 | 29/3/2014 | 825000 | श्री. ए.एस. देसाई रस्ते डांबरीकरण करणे. देयकाची एकूण रक्कम रु . 2000000 |

उपरोक्त खर्च रकमांचे प्रदान हे अंशत: करण्याबाबत तपशीलासह कारणे नमूद केलेली नाहीत. नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 28,29,30 अन्वये रकमा खर्च करण्याबाबत तपशील नमूद आहे. त्यानुसार खर्च करणेबाबत मूळ अंदाजपत्रकामध्ये योग्य तरतूद अथवा यथास्थिती पुनर्विनियोजन करुनच रकमा प्रदान करणेबाबत वेळोवेळी आढावा घेऊन खर्चाच्या नियंत्रणाबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अंशत: प्रदान करणेची शक्यता निर्माण होत नसतांना अंशत: प्रदान करणेच्या कारणाबाबत तपशिल नमूद करणे आवश्यक आहे.

नगरपरिषद लेखासंहिता 1971 परिशिष्ट एक भाग ब, उपविभाग (1) देयकाची तपासणी यामधील (1) (आय) नुसार दोन वेगवेगळया कागदपत्रांचा मेळ घेतला पाहिजे असे विहित केलेल्या सर्व प्रकरणांत अशा त-हेचा मेळ असल्याची नोंद दोन्ही कागदपत्रावर करून अधिकारी / कर्मचारी यांनी अदयाक्षरी केली पाहिजे तथापी उपरोक्त् नमूद एकही अंशत: प्रदान देयकावर तसेच उर्वरीत रक्कम आदा केलेल्या देयकावर अशा नोंदी केल्या नाहीत. तसेच मंजूरीसाठी सादर मंजूर व प्रदान आदेशावर संबंधितांच्या स्वाक्षरी नाहीत. त्यामुळे देय असलेल्या रकमेचे योग्य प्रदान होत असून त्यावर नियंत्रण राहत असल्याचे सिध्द होत नाही. उदाहरणार्थ प्रमाणक क्र. 2474 दि. 5/2/2014 यातील रक्कम रुपये 380249/- पैकी सदर प्रमाणकान्वये उर्वरीत रक्कम रुपये 80249/- आदा केले यापूर्वी रक्कम रुपये 300000/- चे अंशत: प्रदान केलेचे देयकावर नमूद आहे. तथापी सदर अंशत: प्रदान यापूर्वी केव्हा केले होते हे नमूद केले नाही. पुरवठादाराचे रक्कम रु. 380249 बाबतचे मागणी बील क्र. 70 दि. 4/1/2014 यानंतर अंशत: प्रदान झाले असणे आवश्यक असताना तशी नोंद या दरम्यान रोखवहीची पडताळणी केली असता रोखवहीमध्ये आढळलेली नाही. त्यामुळे अंशत: प्रदान रकमेबाबत. खात्री होत नाही. रक्कम रुपये 300000/- अंशत: प्रदान केव्हा केले होते याबाबत पूर्तता आवश्यक आहे. याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली नसल्याने अदा रक्कमेची खात्री पटत नाही यामुळे अतिप्रदान /दुबारप्रदान होण्याची शक्यता आहे.

नगरपरिषद लेखासंहिता नियम 42 (1) ते (4) अन्वये देयकाव्दारे रक्कम प्रदान करण्याविषयी तपशीलवार पध्दत नमूद केली आहे. देयकावर मागणी रकमेची अचुकता मंजूरी व प्रदानार्थ आदेश याव्दारे तपशीलासह अंशत: प्रदान करणेच्या आवश्यकतेबाबत तपशील नमूद करणे आवश्यक होते ते तसे देयकावर अथवा अन्यत्र नोंदलेचे आढळले नाही.

बांधकामाच्या कंत्राटदारास प्रदान करावयाच्या देयकांबाबत लेखासंहिता नियम 174 मधील (1) नुसार न.नं. 131 मध्ये देयक तयार करावे. व (2) नुसार कंत्राटदारांच्या देयकामध्ये त्याने केलेल्या कामाचा तपशील नमूद करुन मोजणी पुस्तक व अन्य अभिलेख्यांबरोबर पडताळले पाहिजे तसेच (3) नुसार केलेल्या मूल्याच्या नऊ दशांश एवढे प्रदान सामान्यत: करावे व कंत्राटदाराने अन्य रक्कम तारण ठेवली नसेल तर उर्वरीत रक्कम जमा ठेवणे आवश्यक असता उपरोक्त प्रमाणकांपैकी बांधकामाकरीता अंशत: प्रदान केलेल्या रकमांकरीता याबाबत शहानिशा न करताच नमुना नं. 131 ऐवजी नमुना नं. 22 या नमुन्यातील देयकांवर कोणताही तपशील नमूद न करता अंशत: प्रदान केले आहे. सदर बाबत नियमबाहय प्रदान झाले आहे.

उपरोक्त 1 ते 4 मध्ये नमूद उणीवा पाहता खर्च करताना अर्थसंकल्पिय तरतूदींचे योग्य नियोजन व यथास्थिती पुनर्विनियोजन न करता रकमांचे अंशत: प्रदान केले आहे. तसेच देयके प्रदान करणेबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे आदेश क्र. नपप्रस1005/विकासकामे/43/05 दि. 29/10/2005 मधील क्र. 5 नुसार अंशत: प्रदान केले असल्यास अंशत: का केले याचा तपशील परिशिष्ट - अ मधील अभिप्राय रकान्यात देण्यात यावा असे नमूद असता परिशिष्ट - अ मध्ये नोंदी न घेताच अंशत: प्रदान केले आहे. त्यामुळे प्रदान योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

### *4 वार्षिक लेखे प्रसिध्दी व सादर करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***वार्षिक लेखे मुदतीत मंजुरीस्तव सादर केले नाहीत तिमाही लेखे निरीक्षणाबाबत सुचना प्रसिध्द केली नाही. विहित मुदतीत संबंधितांना प्राप्त झाल्याचे प्रमाणित होत नाही.*** |

नगरपरिषद सातारा सन 2013/14 चे वार्षिक लेखे मंजुरी प्रसिध्दी व सादर केल्याबाबत पडताळणी केली असता लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 53 दि. 7/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102 (2) अन्वये वार्षिक लेखे पुढील वर्षाच्या 30 जूनच्या आत नगरपरिषदेपुढे सादर केले पाहिजेत, असे असता नगरपरिषद ठराव क्र.36 दि.3/7/2014 अन्वये सादर करुन मंजूरी मिळाल्याची नोंद आहे. त्यामुळे नगरपरिषदेपुढे वार्षिक लेखे मंजुरीसाठी विहित मुदतीमध्ये सादर केले नाहीत.
2) अधिनियमाचे कलम 103 अन्वये तिमाही व वार्षिक लेखे निरीक्षणासाठी ठेवण्यात आल्याची सूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत नमूद केले आहे. नगरपरिषदेने वार्षिक लेख्यांबाबत वार्षिक सुचना प्रसिध्द केली आहे. तथापी तिमाही सूचना प्रसिध्द केलेचे आढळले नाही.
3) अधिनियमच्या कलम 102 (3) नुसार वार्षिक लेख्यांचा गोषवारा मा. संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई, मा. जिल्हाधिकारी सातारा व मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दि. 31 जूलै पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी नगरपरिषदेने जा.क्र.96 दि.31/7/2014 अन्वये संचालक, नगरपालिका प्रशासन यांना गोषवारा सादर केला आहे. त्यामुळे दि.31 जूलै पूर्वी गोषवारा संबंधितांना प्राप्त झालेचे प्रमाणित होत नाही.

उपरोक्त 1 ते 3 बाबत पुर्तता आवश्यक आहे.

DATED5M6601 (Ref No : 15, Hmm No : 53)

## *5 ई-निविदा कार्य प्रणाली लागू करण्याबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| ***ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब केला नाही.*** |
| --- |

लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 54 दि. 7/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद

करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. मातंसं/नस्ती2012/प्र.क्र.273/39/दि.19/1/2013 अन्वये शासनाची विकास कामे, सेवा, वस्तूंची खरेदी इ. बाबींसाठी सर्व विभागांनी दि. 1/2/2013 पासून रक्कम रुपये 10 लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविंदांसाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचे सुचित केले आहे. यासाठी एकंदर 51 शासकीय आस्थापनामध्ये नगरपालिकांचा देखील अंतर्भाव आहे. त्यानुसार सातारा नगरपरिषदेने उपरोक्त दिनांकापासून ई-निविदा कार्यप्रणालीचा 2013-14 मध्ये याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब केला असता तर निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन नगरपरिषदेस अधिक स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असता याप्रमाणे निविदा पध्दती न राबविल्याबाबत खुलासा आवश्यक आहे. सदर बाब ही अत्यंत गंभीर अनियमितता आहे. तसेच त्यामुळे नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे व नगरपरिषदेचे आर्थिक हित जोपासले जात नाही.

## *6 दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : लेखा शाखा न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नगरपालिकेने सन 2013-14 मधील लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवले नसलेबाबत.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 55 दिनांक 7/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विदयमान आर्थिक व्यवस्थापन पध्दतीमध्ये सुधारणा करणे क्रमप्राप्त आहे. ही बाब विचारात घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक लेखास102004/71/प्रक्र 5 नवि-31दि.6 जुलै 2005 अनुसार दुहेरी नोंद लेखापध्दत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करणे आवश्यक केलेले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अचुकता व पादर्शकता आणण्याची निकड व वरील वस्तुस्थिती विचारात घेता नागरी स्थानिक संस्थांचे लेखे दुहेरी नोंद लेखा पध्दतीने ठेवणे क्रमप्राप्त आहे.

शासन निर्णय क्र.लेखास-102004/71/प्र.क्र.5 नवि-31दि.6 जुलै 2005 मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी राज्यातील सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदांनी दि.1/4/2005 पासून सुरु करावी. तसेच सर्व नगरपरिषदांनी सन 2005/06 च्या लेख्यांपासून उपरोक्त शासन निर्णयानुसार कोडींग पध्दतीचा वापर करणे अनिवार्य राहिल दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करताना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुर्वीची रोख तत्वावर लेखा ठेवण्याची पध्दती व दुहेरी नोंद लेखा पध्दती या दोन्ही पध्दतीने लेखा ठेवावयाचे आहे असे असताना देखील सातारा नगरपरिषदेने अदयापपणे तो दुहेरी नोंद लेखापध्दतीची कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून आले आहे याबाबत अशी कार्यवाही करुन उक्तपध्दतीची लेखापध्दत सुरु करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

DATMSSM6801 (Ref No : 17, Hmn No : 55)

## *7 आर्थिक गणना 2013 खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 14 नुसार कोणतेही प्रदान धनादेशाव्दारेच देण्यात यावे असे असताना रकमा रोखीने अदा केलेल्या आहेत.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 75 दि. 15/05/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करणेत येत आहे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| 3015 | 27/03/2014 | 480500 | आर्थिक गणनेकरीता प्रगणक यांना देय असलेल्या मानधन खर्च रक्कम रु. 451500 प्र् शिक्षण खर्च रक्कम रु. 27000 व प्र् शिक्षणाकरीता खर्च रक्कम रु. 2000 |

उपरोक्त नमूद प्रमाणकान्वये नगरपालिकेने सहावी आर्थिक गणना या 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत

योजना या कार्यक्रमांतर्गत सन 2013- 2014 या आर्थिक वर्षात आपल्या कार्यक्षेत्रात गणनेचे काम करणा-या प्रगणक यांना देय असलेल्या मानधन खर्च रक्कम रु. 451500 प्र शिक्षण खर्च रक्कम रु. 27000 व प्र शिक्षणाकरीता खर्च रक्कम रु. 2000 असा एकूण रु 480500 इतका खर्च केलेला आहे.

सातारा नगरपालिकेच्या चार्जसाठी आर्थिक गणनेचे प्रगणन केलेल्या 54 प्रगणक मानधन प्रतिप्रगणक (चार गटासाठी) 8400 व प्रशिक्षण भत्ता दोन दिवसांचा 500 असे एकूण 8900 प्रति प्रगणक व प्रशिक्षणासाठी केलेला खर्च असे एकूण रक्कम रुपये 480500/- इतका खर्च नगरपालिकेने रोखीने केलेला आहे. उपरोक्त नमुद प्रमाणकावर असलेल्या कामाचा तपशील रकान्यामध्ये सदर रक्कम रोखीने आदा करण्यांस मान्यता मिळणेबाबत नमुद आहे.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 14 नुसार कोणतेही प्रदान धनादेशाव्दारेच देण्यात यावे असे असताना रोखीने प्रदान करण्याबाबत दिलेली मंजुरी लेखापरीक्षणांस मान्य करता येत नाही.या बाबत साधार पुर्तता करावी यापुढे योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

## *8 मागासवर्गीय कल्याण सदरी खर्चाबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मागासवर्गीय कल्याण सदरी कमी खर्च केलेला आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 81 दिनांक 22/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र शासन नगरविकास व आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमाक बी.सी.सी.1063/1630/प्रक्र122/93नाविल दि. 20/12/93 अनुसार नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मागास वर्गीय दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी योजना नगरपालिका उत्पन्नाच्या ( बाधील खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ उत्पन्नाच्या) 5% इतकी रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेने खालीलप्रमाणे रक्कम रुपये 1539310 इतका कमी खर्च केलेला आहे.

| सन | उत्पन्न | 5% | प्रत्यक्ष | कमी खर्च |
|---|---|---|---|---|

| | | प्रमाणे होणारी रक्कम | केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|
| 2013-14 | 52389374 | 2600000 | 1060690 | 1539310 |

सन 2013-14 या वर्षातील अनुशेष रक्कम रु. 1539310 पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्याबाबत नगरपरिषदेने दक्षता घ्यावी.

DATMGSM6801 (Ref No : 34, Hmm No : 81)

## *9 वाहन दुरुस्ती खर्चाबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1047036.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1047036.00/-

***नगरपरिषद सातारा सन 2013-14 मधील नगरपरिषदेच्या वाहनाची हिस्ट्रीसीट पडताळता वाहनावरच्या दुरुस्तीवर जादा खर्च झालेला दिसून येतो.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 82 दिनांक 22/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

नगरपालिका साताराने खालील प्रमाणकांन्वये विविध वाहन दुरुस्तीवर खर्च केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 352 | 14/5/2013 | 79700 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 302 | 9/5/2013 | 137788 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 509 | 5/6/2013 | 3470 | केदार टायर्स वर्क्स वाहन दुरुस्ती |
| 1025 | 2/8/2013 | 94892 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1034 | 2/8/2013 | 40422 | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| 1019 | 1/8/2013 | 104740 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1112 | 16/8/2013 | 15500 | पंडित ऑटोमोटीव्ह प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1113 | 16/8/2013 | 458 | पंडित ऑटोमोटीव्ह प्रा. लि. वाहन दुरुस्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| 1158 | 23/8/2013 | 29244 | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| 1150 | 23/8/2013 | 8066 | बाळासाहेब सोपान धेडगे वाहन दुरुस्ती |
| 1173 | 26/8/2013 | 3310 | केदार टायर्स वर्क्स वाहन दुरुस्ती |
| 1267 | 5/9/2013 | 21617 | हेम मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1556 | 7/10/2013 | 88666 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1817 | 30/10/2013 | 90212 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1817 | 30/10/2013 | 21137 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 1986 ते 1991 | 22/11/2013 | 2980 | केदार टायर्स वर्क्स वाहन दुरुस्ती |
| 2437 | 27/1/2014 | 171783 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 2490 | 5/2/2014 | 22654 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 2522 | 10/2/2014 | 9522 | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| 2530 | 10/2/2014 | 28039 | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| 2640 | 18/02/2014 | 50064 | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| 2789 | 10/3/2014 | 33711 | पंडित ऑटोमोटीव्ह प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 2792 | 10/3/2014 | 85135 | मे.हिंदुस्थान मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 3093 | 29/3/2014 | 61217 | हेम मोटर्स प्रा. लि. वाहन दुरुस्ती |
| 3098 | 29/3/2014 | 7500 | प्रशांत शिवाजीराव निकम आर.टी.ओ. पासिंग |
| | | 1211827 | |

**सदर खर्चाचे लेखापरीक्षण करता खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.**

1) नगरपालिका साताराचे सन 2013-14 च्या लेखापरीक्षणात वाहन विभागाने देखभाल दुरुस्ती करीता खर्च केला आहे. सदर खर्चाचे लेखापरीक्षण केले असता नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्र.न.प्र.स./वाहनधोरण/2005/प्र.क्र.05/9 दि. 10 मे 2005 तसेच स्थायी निदेश क्रमांक 32 मधील उप परिच्छेद क्रमांक 35 मध्ये नमूद केलेप्रमाणे जी वाहने मैल अंतर कमी देत असतील व ज्याच्यावरील दुरुस्तीचा खर्च जादा आहे, अशी वाहने निर्लेखीत करावीत तसेच अशा वाहनावर मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणेकामी खर्च करण्यात येऊ नये असे शासन आदेश असतांना न.पा.ने खालील नमूद वाहनाच्या दुरुस्तीवर वारंवार खर्च केल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | इंधन प्रकार | खरेदी दिनाक | वय | 2013-14 मधील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | टाटा इंडिगो कार | एम.एच 11 एबी 1000 | पेट्रोल | 18/2/2008 | 7 वर्षे | 14881 |
| 2 | टाटा इंडिगो | एम.एच 11 | पेट्रोल | 19/12/2007 | 8 वर्षे | 73931 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कार | एबी 1001 | | | | |
| 3 | टाटा 1336 अग्निशमन वहान | एम.एच 11 जी 7011 | डिझेल | 4/5/2001 | 14वर्षे | 194109 |
| 4 | टाटा 1612 डंपर | एम.एच 11 ए 5728 | डिझेल | 5/10/1995 | 20 वर्षे | बंद |
| 5 | ट्रॅक्टर | एम.एच 11जी 2022 | डिझेल | 24/7/1997 | 18 वर्षे | 52484 |
| 6 | टाटा 709 टिपर | एम.एच 11जी 7001 | डिझेल | 25/6/1999 | 16 वर्षे | 63906 |
| 7 | टाटा 709 टिपर | एम.एच 11जी 7002 | डिझेल | 25/6/1999 | 16 वर्षे | 111998 |
| 8 | टाटा 1613 मैला सक्शन | एम.एच 11 एफ 4999 | डिझेल | 9/6/1998 | 17 वर्षे | 187656 |
| 9 | टाटा 709 अग्निशमन वहान | एम.एच 11 एबी 8004 | डिझेल | 15/9/2004 | 11 वर्षे | 148814 |
| 10 | टाटा 1109 टिपर | एम.एच 11 एबी 8199 | डिझेल | 18/9/2012 | 2 वर्षे | 2958 |
| 11 | टाटा 1613 अग्निशमन वहान | एम.एच 11 एबी 8200 | डिझेल | 16/8/2012 | 2 वर्षे | - |
| | एकूण | | | | | 850737 |

उपरोक्त वाहनांच्या इतिहास नोंदवहयांचे लेखापरीक्षण केले असता उपरोक्त वाहनावर सन 2012-13 मध्येही देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आलेला आहे . असे असतानाही नगरपालिकेने स्थायी निदेशाप्रमाणे कार्यवाही न करणेबाबत खुलासा करुन स्थायी निदेशाप्रमाणे कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी .

2) उपरोक्त उपपरिच्छेद क्रमांक 1 पहाता वर्षातील प्रमाणकांच्या एकूण खर्च 1211827 असून त्यामधून विमा व आरटीओ पासिंग रु. 164791 वजा जाता रु. 1047036 इतकी रक्कम हिस्ट्रीशिटला नोंद करणे आवश्यक असतांना रु. 850737 खर्च नोंदला आहे. रु. 196299 इतका खर्च हिस्ट्रीशिटला का नोंदला नाही याबाबत खुलासा करावा व नोंद करुन पुर्तता दाखवावी.

3) वाहन विभागाने सन 2013-14 मध्ये सर्व वाहनांकरीता नविन स्पेअर पार्ट्स बसविणे कामी खर्च केला आहे. नविन पार्ट्स बसवून काढलेले जुने पार्ट्स नगरपरिषदेकडे जमा करावयाचे आहेत असे असतांना जमा केलेल्या जुन्या पार्ट्सची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे जुने पार्ट्स संबंधीत ठेकेदार यांनी नगरपरिषदेकडे जमा केले असलेबाबत खात्री करता आली नाही. तसेच लेखापरीक्षण कालावधी सन 2013-14 मध्ये वाहनांच्याजुन्या पार्ट्सचा लिलाव केल्याचे दिसून आले नाही. तरी जुन्या पार्ट्स बाबत नगरपालिकेन काय कार्यवाही केली याबाबतचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा. तसेच जुने पार्ट्सची नोंदवही ठेवून

अद्यावत नोंदी घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी. नगरपालिकेने स्पेअर पार्ट्स संबंधीत ठेकेदाराकडून जमा करुन घेऊन सदर पार्ट्सची लिलावाने विक्री करुन लिलावापोटी जमा होणारी रक्कम नगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक होते तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे नगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी सदर नुकसानीची जबाबदारी संबंधीतांवर निश्चित करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी. उपरोक्त पुर्तता करीपर्यंत रक्कम रु. 1047036/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATMSL (Sl ... Ref No : 35, Item No : 82)

## 10 नगरपरिषद वाहनांना स्पेअर पार्ट्स पुरविणे निविदेबाबत व पूनर्प्रत्ययी आदेशाबाबत.

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1047036.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1047036.00/-

***नगरपरिषद सातारा ने वाहनांना स्पेअर पार्ट्स पुरविणेकामी मे. हिंदुस्थान मोटर्स सातारा यांना सन 2009-10 च्या निविदेप्रमाणेच पूर्नप्रत्ययी आदेश देतांना शासन निर्णय दि 2/01/1992 चे उल्लंघन झाले आहे. तसेच सन 2008 च्या शासन आदेश ज्याप्रमाणे पुनर्प्रत्यायी आदेश देण्यास बंदी घालणेत आलेली आहे.***

मुदत वाढ टिपणी दिनांक - 26/11/2013
स्थायी समिती ठराव क्रमांक 923 दि. 26/11/2013 सन 2013-14 करीता न.पा. वाहनांना स्पेअर पार्ट्स पुरविणे कामी मंजूरी दिली आहे.
तरतूद रक्कम रु. 1160000/-

नगरपरिषद सातारा सन 2013-14 मध्ये नगररिषद. वाहनांना स्पेटर पार्ट्स पुरविणेकामी मे. हिंदुस्थान मोटर्स सातारा यांना रक्कम रुपये 1047036/- एवढी रक्कम प्रदान केली आहे. लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 84 दिनांक 22/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) नगर परिषदेने सन 2009-10 करीता मे.हिंदुस्थान मोटर्स सातारा यांचेबरोबर वाहनाचे स्पेअर पार्ट्स पुरविणेबाबत करार केला असून सन 2010-11, 2011-12, 2012-13 व 2013-14 करीताही मे. हिंदुस्थान मोटर्स सातारा यांनाच वाहनांचे स्पेअर पार्ट्स पुरविण्याचे काम दिले आहे. महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांसख1088/(2512)उद्योग-6 दि. 2/1/1992 परिच्छेद 8.3 (परिशिष्ट 7) नुसार निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्यास पूनर्प्रत्ययी आदेश देण्याबाबत तरतुद आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी सन 2009-10 नंतर 4 वर्षांचा कालावधी लोटलेला असल्याने तसेच निविदा प्रक्रिया राबविली गेली नसल्याने सन 2009-10 च्या निश्चित केलेल्या दरानुसार

पुरवठा दाराकडून केलेली खरेदी उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

2) महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रामांक भांसख-2008/प्रक्र256/08/उद्योग-4दि. 10 ऑक्टोबर 2008 अनुसार शासकीय कार्यालयांनी त्यांना आवश्यक असणा-या वस्तु/सामान खरेदी करतांना सर्व साधारण कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिका-याच्या मते करारास मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्या बाबत स्पष्ट करणे नमूद करुन तसेच शासन कार्य नियमावली नुसार संबंधीत प्रशासकीय विभागाशी सल्ला मसलत केल्यानंतरच योग्य कार्यवाही करण्याचे आदेश आहेत. नगरपरिषदेने सदर कार्यवाही न करता सलगपणे 4 वर्षे करारास मुदत वाढ दिलेली आहे. सदर कार्यवाही शासन निर्णयाशी विसंगत असल्याने सदर प्रकरणी शासनाचे क्षमापन घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक मातस/नस्ती2012/प्रक्र273/39/दि19/1/2013 अन्वये सेवा वस्तुंची खरेदी इत्यादी बाबींसाठी सर्व विभागांनी दि. 1/2/2013 पासून रक्कम रु. 10 लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविदांसाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचे सुचित केले आहे. तथापि सातारा नगरपरिषदेने उपरोक्त खरेदीसाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब न करता खरेदी केली आहे. यास्तव उपरोक्त शासन आदेश दि. 19/1/2013 मधील तरतुदीचा भंग झालेला आहे. यास्तव शासनाचे क्षमापन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त पुर्तता करेपर्यंत रक्कम रुपये 1047036 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATMSSM6801 (Ref No : 37, Hmm No : 84)

### *11 क्रिडा विषयक बाबीवरील खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 360000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 360000.00/-

| ***उपप्रमाणकाशिवाय व साठा नोंदवहीतील नोंदींशिवाय खर्च केलेला आहे.*** |
|---|

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 86 दि. 26/05/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करणेत येत आहे.

1) प्रमाणक क्रमांक 1550 दि. 07/10/2013 रु. 300000

2) प्रमाणक क्रमांक 2700 दि. 01/03/2014 रु. 60000

अ) उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1550 अन्वये नगरपरिषदेने दि. 27/09/2013 ते 29/09/2013 या कालावधीत सातारा जिल्हा

अऑमॅच्युअर वेटलिफ्टिंग असोसिएशन ही राज्यस्तरीत वेटलिफ्टिंग स्पर्धा आयोजित करुन त्यावर खर्च केलेला आहे. सदरहू खर्चाच्या प्रमाणकांचे अवलोकन केले असता प्रमाणका सोबत एक टिपणी सादर केली असून त्या आधारे रु. 300000/- आदा केले आहेत. परंतु याबाबत प्रमाणकासोबत संबंधित स्पर्धेकरीता कोणकोणत्या बाबींवर खर्च केलेला आहे याचा तपशील कोठेही नमूद नाही. टिपणीच्या आधारे केलेला खर्च व मंजूरी लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

ब) तसेच वर नमूद प्रमाणक क्रामांक 2700 अन्वये रु. 60000 सातारा नगरपरिषद कर्मचारी क्रिडा संघाच्या वतीन आयोजित नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धा दि. 01/03/2014 व 02/03/2014 अखेर आयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धेकरीता रोख बक्षीस ट्रॉफीज तसेच मंडप, ग्राऊंड भाडे, स्पिकर, संयोजन समितीला जेवण, नाष्टा व चहा आदी बाबींकरीता रुपये 60000 खर्च केल्याचे नोंदले आहे.

सदर खर्चाच्या प्रमाणकचे अवलोकन केले असता प्रमाणकासोबत एक टिपणी घेतलेली असून त्याआधारे सदर रक्कम आदा केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 14 नुसार कोणतेही प्रदान धनादेशाव्दारेच देण्यात यावे असे असताना रोखीने प्रदान करण्याबाबत दिलेली मंजुरी लेखापरीक्षणांस मान्य करता येत नाही.या बाबत साधार पुर्तता करावी यापुढे योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

परंतु या बाबींवरील खर्चाबाबत कोणतीही उपप्रमाणके मूळ प्रमाणकासोबत जोडलेली नाहीत.

उपरोक्त दोन्ही बाबींवरील खर्च करतांना दरपत्रके/निविदा मागविली किंवा नाही याबाबतही कोणतेही अभिलेखे नस्तीसोबत नाही. खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी नोंदवहीत घेऊन विनियोग दाखविणे आवश्यक आहे.

फक्त टिपणीच्या आधारे केलेला एकूण खर्च रु. 360000 लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

## *12 नगरपरिषद कार्यक्षेत्रासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 नगरपरिषद निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 210000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 210000.00/-

***पर्यावरण विषयक सद्यस्थिती अहवाल दिनांक 31 जुलै पूर्वी तयार केलेले नाही. सन 2012-13 चा अहवाल खाजगी संस्थेमार्फत तयार करणेची कार्यवाही वेळेवर पूर्ण केली नाही.***

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र. इएसआर 2010/प्रक्र 40/2010/ताक्र 1 दिनांक 4 जुन 2010 अन्वये "अ" वर्ग नगरपरिषदांनी पर्यावरण सद्यस्थिती विषयक अहवाल 31 जुलै पर्यंत तयार करणे आवश्यक आहे. सदर पर्यावरण अहवाल नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर नागरीकांसाठी उपलब्ध करुन देणे

आवश्यक आहे. नगरपरिषदेने सन 2012-13 या वर्षाचा पर्यावरण विषयक अहवाल तयार करण्यासाठी पुढील प्रमाणे खर्च केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 1945 | 16/11/2013 | 210000 | गुरुमाऊली फौंडेशन, इचलकरंजी सन 2012-13 चा पर्यावरण विषयक अहवालाकरीता आदा |

लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 95 दि. 26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे जा.क्र.नपप्रसं/2013/E.A.PL./A CLASS/प्रक्र45/कक्ष11 दि.12/2/2013 अन्वये सन 2007-08 ते 2011-12 पर्यंत प्रतिवर्षी नगरपरिषदेने दि. 31 जुलै पूर्वी पर्यावरण विषयक सद्यस्थिती अहवाल तयार करुन मान्यता घेऊन शासनाच्या 1) नगरविकास, 2) पर्यावरण, 3) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना सादर करणे आवश्यक आहे. तो प्रतिवर्षी दि. 31 जुलै पूर्वी सादर केला किंवा कसे याबाबत संचालनालयाने प्रपत्रामध्ये माहिती मागविली असता दि. 7/6/2012 च्या नोंदीनुसार सन 2007-08 ते 2009-10 या वर्षाकरीता पर्यावरण विषयक सद्यस्थिती अहवाल नगरपरिषदेने तयार केलेला नाही. असे निष्पन्न झाले आहे.
2) सन 2012-13 करीता सदरचा अहवाल तयार करणेकरीता अंदाजपत्रकात रक्कम रु. 200000 एवढी तरतूद केली. मात्र नगरपरिषदेस या अहवालात प्रदुषण, घनकचरा, सांडपाणी, वृक्षारोपण यांच्या बाबतच्या नियोजनासाठीचे निकषाप्रमाणे कोणत्या बाबीकरीता अहवालात काय तपशील आवश्यक आहे त्यासाठी अंदाजे खर्चाची तरतूद नमूद करुन तसे अंदाजपत्रक तयार केलेले नाही. त्यामुळे तरतूद वास्तव असल्याचे म्हणता येत नाही.
3) सन 2012-13 या वर्षाचा अहवाल उपरोक्त खाजगी संस्थेकडून तयार करणेसाठी ठराव क्रमांक 223 दि. 18/6/2012 अन्वये निविदा प्रसीध्दीस मान्यता दिली. प्रसिध्दीस प्रतिसाद मिळून 3 निविदापैकी सर्वात कमी दरासाठी म्हणजे 5% जादा दराची मे. गुरुमाऊली फौंडेशन इचलकरंजी यांची रुपये 210000 एवढया रकमेची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक 258-7/8/2012 ने मंजूर केली. वास्तविक नस्ती मधील नोंदी पाहता तसेच दै. तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये दिनांक 8/7/2012 रोजी प्रसिध्द जाहिरात पहाता यात कोठेही अंदाजपत्रकीय रकमेचा उल्लेख नाही. असे असता 5% जादा दराची रक्कम रु. 210000 काय आधारे निश्चित केली याचा खुलासा आवश्यक आहे.
4) सदर निविदाकारासमवेत दि. 14/8/2012 रोजी रु. 100 मुल्याच्या खरेदी केलेल्या मुद्रांक पत्रावर रु. 210000 एवढया रकमेकरिता करारनामा केला. मात्र करारनाम्याचा दिनांक नमूद नाही. ठेकेदाराने त्याच्या दिनांक 22/10/2012 च्या पत्रान्वये त्याने मुद्रांकावर करारनामा केला असून अद्याप कार्यादेश प्राप्त नसल्याने तो देण्याविषयी विनंती केली आहे. नगरपरिषदेने कार्यादेश दि. 1/9/2012 नमूद केला आहे. मात्र तो प्राप्त झाल्याबाबत ठेकेदाराची पोहोच दि. 21/11/2012 रोजीची आहे. नगरपरिषदेने ठेकेदारास सदरचा अहवाल अप्राप्त असलेबाबत जा.क्र.सानप/333 दि.24/1/2013 अन्वये विचारणा केली असता, त्याने कार्यादेश उशिरा प्राप्त

झालेची बाब अधोरेखीत केली आहे. याबाबीमुळे करारनाम्यातील अट क्रमांक 8 अन्वये नमूद दंड रकमेस ठेकेदार बाध्य राहीला नाही.

5) सदरचा अहवाल ठेकेदाराने त्याच्या दिनांक 8/10/2013 च्या पत्रासोबत सादर केला आहे. नगरपरिषदेच्या शहर स्वच्छता आराखडयाकरीता सदर अहवालातील माहिती आवश्यक असतांना त्यास उशीर झाल्याने शहर स्वच्छता आराखडा वेळेवर सादर करण्यावर परिणाम झाला किंवा कसे याबाबत पूर्तता होणे आवश्यक आहे. अहवालास उशिर झाल्यामुळे याकरीता केलेल्या खर्चाचा वेळेत विनियोग झाल्याचे प्रमाणीत होत नाही.

6) उपरोक्त दिनांक 4 जून 2010 च्या शासन निर्णयानुसार दरवर्षी दि. 31 जुलैपूर्वी सदरचा अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तथापि सन 2013-14 चा अहवाल सादर करणे विषयी नगरपरिषदेने कार्यवाही केलेली नाही.

नागरिकांना नगरपरिषद कार्यक्षेत्रात योग्य पर्यावरण निर्माण करणे ही नगरपरिषदेची जबाबदारी आहे. तसेच शासनाने पर्यावरणाचा समतोल राखण्याबाबत काटेकोर भूमिका घेतली असून शासनाचा हा प्राधान्यक्रमाचा विषय आहे. पर्यावरणविषयक अहवाल वेळेवर सादर न केल्यामुळे नगरपरिषदेस या अनुषंगाने विकास कामाकरिता प्राप्त होणा-या अनुदानावर परिणाम होऊ शकतो.

[illegible] (Ref No : 48, Para No : 95)

## *13 देयक नमुन्यांबाबत व लेखाशिर्ष बदल केल्याबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 677860.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 677860.00/-

***खर्च रकमा देयकांच्या योग्य नमुन्यात पारीत केल्या नाहीत. देयकावरील सर्व नोंदी पूर्णतः नोंदल्या नाहीत. मूळ तरतूदीऐवजी अन्य लेखाशीर्षाखाली प्रयोजन नमूद न करता खर्च केला आहे.***

नगरपरिषद, सातारा सन 2013-14 निवड महिन्यातील प्रमाणकांचे रेखांकन केले असता खर्च प्रमाणकांची देयके व लेखाशीर्ष लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 96 दि. 26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) नगरपरिषदेने देय असलेल्या रकमा नगरपरिषद लेखासंहिता नियम 1971 अन्वये विहीत केलेल्या देयकांच्या ज्या त्या नमुन्यामध्ये तयार करुन पारीत केली पाहिजेत. तथापि पुढील देयकांबाबत योग्य ते नमुने वापरले नाहीत.

नगरपरिषद सातारा

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 1582 | 8/10/2013 | 5100 | नळकरी प्रशिक्षणार्थी मानधन |
| 2456/1 | 1/2/2014 | 27600 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना समूह संघटक मानधन |
| 2456/2 | 1/2/2014 | 40000 | वरीलप्रमाणे प्रकल्प अधिकारी मानधन. |
| | एकूण | 72700 | |

उपरोक्त देयके लेखासंहिता नमुना नं. 22 या नमुन्यात आवश्यक असता नोटबुक पेपर/मागणी प्रपत्रावर प्रमाणक क्रमांक नोंदवून आदा केली आहेत. यावर देयक सादर, मंजूर , पारीत, प्रदान व रक्कम प्राप्त या नोंदी केलेल्या नाहीत. लेखाशीर्ष नोंदविले नाही. अंदाजपत्रकीय तरतूद, खर्च व शिल्लक रक्कम नमूद केलेली नाही. याबाबत नगरपरिषद लेखासंहिता 1971चे नियम 42 याचे उल्लंघन झाले आहे. यामुळे सदर प्रदान विधीग्राहय होत नाही. याप्रमाणे कार्यवाही न केल्याबाबत खुलासा आवश्यक आहे. तोपर्यंत सदर खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) खालील रकमांचे प्रदान मूळ प्रमाणकांऐवजी छायांकित प्रतिलिपी (XEROX) च्या आधारे प्रदान केले आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| 2472/1 | 3/2/2014 | 44856 | श्री. बालशेटवार | न्यायालयीन तडजोडीने घरपट्टी दावा रकमांचे समायोजन |
| 2472/222472/3 | 3/2/2014 | 11176 | श्री. राघवेंद्र | |
| | 3/2/2014 | 26858 | श्री. बागवान | |
| | एकूण | 82890 | | |

प्रतिलिपी देयकावर कोणत्याही प्राधिकृत अधिका-याची साक्षांकनाबाबत स्वाक्षरी नाही. नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 42(4) अन्वये जेव्हा या प्रकारे प्रदान करण्यात येईल तेव्हा प्राधिकृत अधिका-याने मूळ देयकाचे प्रदान केलेले नाही. असे प्रमाणीत केले पाहिजे. तथापि या प्रमाणे कार्यवाही न करताच प्रदान केल्याने नियमबाहयता झाली आहे. सबब सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) पुढील प्रमाणकाद्वारे खर्च रकमेच्या लेखाशिर्षामध्ये बदल केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 1852 | 30/10/2013 | 522270 | मनोज शेटे भैरवनाथ मंदीर ते कावेरी चौक ते मैदान STREET LIGHT बसविणे. |

सदर ठेकेदार हे विद्युत देखभाल व दुरुस्तीकरीता नियुक्त ठेकेदार आहेत. तसेच सदरचे काम हे विद्युत पथदिवे बसविणेचे आहे. मात्र देयकावर विद्युत दिवे व पोल हे लेखाशिर्ष खोडून उपरीलेखनाने विकासकाम (सुधारीत) हे लेखाशिर्ष नोंदले असून

खर्च नोंदवहीमध्ये देखील याच शीर्षाखाली नोंदला आहे. सन 2013-14 चे सुधारीत अंदाज व खर्च पहाता विद्युत दिवे व पोल या सदरी नमुना नं. 43अ अ.क्र. 22 अन्वये रक्कम रुपये 6000000/- एवढी तरतूद असून वर्षा अखेर एकूण खर्च रक्कम रु. 3393023/- एवढा झाला आहे. असे असतांना सुधारीत अंदाजपत्रक तपशिल खर्च वाढ या सदरी अ.क्र.35 अन्वये मूळ तरतूद नसतांना फक्त उपरोक्त खर्चापोटी रक्कम रुपये 550000 विकास कामे हया नवीन लेखाशिर्षाखाली सुधारीत तरतूद करुन उपरोक्त खर्च केला आहे. मूळ लेखाशिर्ष विद्युत दिवे व पोल या सदरी पूरेशी तरतूद व शिल्लक असतांना नवीन लेखाशिर्षाखाली खर्च नोंदण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे. यामुळे महाराष्ट्र नगरपरिषद , नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(6) मधील तरतुदींचे पालन न केल्यामुळे नियमबाहयता झाली आहे. सबब सदर रक्कम रु. 522270/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

No : 49, Para No : 26)

### *14 आयकर उद्गम करकपात विलंबापोटी दंड व्याज आकारणीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 51625.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15305.00/-

***टी.डी.एस. कपातीच्या रकमा आयकर विभागास वेळेवर भरणा केल्या नाहीत. तसेच यासाठीचे विवरणपत्र वेळेत सादर केले नाही. या दोहोंमुळे व्याज व दंड आकारणी झाली आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासमापत्र क्र. 98 दि. 26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

सातारा नगरपरिषद लेखापरीक्षण सन 2013-14 दरम्यान निवड महिन्यातील प्रमाणकांचे रेखांकन करीत असतांना पुढील प्रमाणकान्वये आयकर विवरणपत्र सादर करणेपोटी कर सल्लागार यांनी फी आदा केली आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|

नगरपरिषद सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| 2652 21/2/2014 7235 | | | पुरुषोत्तम ओझर्डे, सन 2011-12 मधील पहिल्या व दुस-या तिमाहीतील आयकर विवरण पत्र आयकर विभागाकडे सादर केलेल्या कामाची फी. |
| 2653 21/2/2014 | 7070 | | रोहीत ग्रामोपाध्ये सन 2012-13 करीता वरीलप्रमाणे आदा. |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. संबंधीत कर सल्लागार यांनी आयकर विभगास सादर केलेल्या तिमाही विवरणपत्रावर आयकर विभागाने पाठविलेल्या TRACES (टी.डी.एस. निर्धारण विश्लेषण व दुरुस्ती प्रणाली) मध्ये डीफॉल्ट रक्कम सदरी 1. शॉर्ट पेमेंट 2. शॉर्ट डिडक्शन/कलेक्शन यापोटी पुढील प्रमाणे व्याज व दंडाच्या रकमा आकारणी केल्या आहेत.

अ) सन 2011-12 मधील दुस-या व तिस-या तिमाही विवरणपत्राबाबत उपायुक्त आयकर विभाग (TDS) यांनी पुढीलप्रमाणे पत्र पाठविले आहे.

| अ.क्र. | पत्र क्रमांक | तिमाही |
|---|---|---|
| 1 | TDS/1112/26Q/D/100003905258 | Q2 |
| 2 | TDS/1112/26Q/D/100003905259 | Q3 |

उपरोक्त पत्रान्वये पुढील रकमा शॉर्टि डिडक्शन/कलेक्शन व शॉर्ट पेमेंट यावर विविध कलमांखाली व्याज व दंड सदरी आकारल्या आहेत.

| उपरोक्त पत्र क्रमांक | पत्रातील अ.क्र. | टाईप ऑफ डिफॉल्ट | त्यापोटी देय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 1 | short payment | 1882 |
| 1 | 3(a) | Interest on short payment | 744 |
| 2 | 1 | short payment | 2645 |
| 2 | 3(a) | Interest on short payment | 1012.50 |
| | | एकूण | 6283.5 |

ब) सन 2012-13 मधील पहिल्या, दुस-या व तिस-या तिमाही विवरणपत्राबाबत उपायुक्त आयकर विभाग (TDS) यांनी पुढीलप्रमाणे पत्र पाठविले आहे.

| अ.क्र. | पत्र क्रमांक | तिमाही |
|---|---|---|
| 1 | TDS/1213/26Q/D/100003897352 | Q1 |
| 2 | TDS/1213/26Q/D/100003897354 | Q2 |
| 3 | TDS/1213/26Q/D/100003897350 | Q3 |

उपरोक्त पत्रान्वये पुढील रकमा शॉर्ट डिडक्शन कलेक्शन व शॉर्ट पेमेंट यावर विविध कलमांखाली व्याज व दंड

सदरी आकारल्या आहेत.

| उपरोक्त पत्र क्रमांक | पत्रातील अनुक्रमांक | टाईप ऑफ डिफॉल्ट | त्यासाठी देय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 2 | short deduction/ collection | 3321.20 |
| | 4(a) | Interest on short deduction/ collection | 726 |
| 2 | 6 | under section 220(2) | 512 |
| | 5(a) | Late filing lavy | 12800 |
| 3 | 3(b) | Interest on late payment | 282 |
| | 4(a) | Interest on short deduction/ collection | 112 |
| | 2 | short deduction/ collection | 720 |
| | 5 | Late filing lavy | 11200 |

29673.2

उपरोक्त व्याज व दंडाच्या रकमा या शॉर्ट डिडक्शन/कलेक्शन या रकमांवर आकारलेल्या आहेत. याबाबत आढावा घेतला असता नगरपरिषद ठेकेदार, पुरवठादार व इतर देयकांमधून कपात आयकराच्या रकमा वेळेवर भरणा करीत नसल्याने सदर बाब उद्भवली आहे.

2. उपरोक्त type of default मधील अ.क्र. 5 अन्वये कलम 234E याखाली Late filing fee पोटी रकमा आकारल्या आहेत. याचा अर्थ विवरणे उशीरा सादर केली आहेत. याची जबावदारी निश्चित करणे आवश्यक आहे. कर सल्लागार जबाबदार असतील तर त्यांना फी आदा केलेली फी वसूलपात्र आहे.

3. उपरोक्त type of default मधील अ.क्र. 3(c) additional late payment interest against the processing of latest correction या सदरी अनुक्रमे रक्कम रु. 7812 व रु. 1399.50 या नगरपरिषदेच्या विवरणपत्रात आधीच दर्शविल्याने या सोबत देय दर्शविलेल्या नाहीत. याचप्रमणे उपरोक्त दंड व व्याजाच्या रकमांची आकारणी होऊ शकते. याबाबत कर सल्लागार यांनी नगरपरिषदेस अवगत करणे आवश्यक होते. तसे अवगत न केल्यामुळे त्यांना आदा फी योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

4. सदर दंड व व्याज या रकमा सन 2011-12 व 2012-13 या दोन वर्षांकरीता आकारलेल्या आहेत. वास्तविक एका वर्षात या प्रकारची आकारणी झाल्यानंतर पुन्हा वेळेवर आयकर व विवरणपत्र भरणा होणे आवश्यक असतांना याची पुनरावृत्ती झाली आहे.

उपरोक्त 1 ते 4 मध्ये नमूद बाबी पाहता, शासनाकडे भरणा करावयासाठी कपात केलेल्या रकमा वेळेवर भरणा न केल्याने नगरपरिषदेस नाहक व्याज व दंड आकारणीस सामोरे जावे लागले आहे. लेखापरीक्षण कालावधी अखेर उपरोक्त दंडाची रक्कम आयकर सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती पहाता याबाबत आयकर विभागासमवेत पत्रव्यवहार सुरु असून त्यातील नोंदींनुसार पॅनकार्ड क्रमांक नमूद न करणे, चुकीचा नोंदविणे यामुळे काही दंडाच्या रकमा दर्शविल्या आहेत. त्या क्षमापित करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

त्यामुळे उपरोक्त रक्कम अद्याप भरणा करण्यात आली नाही. अथवा आयकर विभागाने नोटीस दिलेली नाही. याबाबत योग्य ती कार्यवाही केल्याबाबत पुर्तता आवश्यक आहे.

याबाबत नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 2 (अ) (1) अन्वये विहीत केलेल्या परिशिष्ट एक सर्वसाधारण वित्तीय तत्वे यातील तरतूदीचे काटेकोर पालन करणे गरजेचे आहे.

DATMVJM7001 (Ref No : 51, Hmm No : 98)

## *15 जयंती उत्सव साजरे करणे- खर्चाबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 185000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 185000.00/-

***महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यासाठी व्यक्तीगतरित्या रक्कम अदा केली आहे. तसलमातीने अदा केलेल्या रकमेचे समायोजन केलेले नाही.***

महापुरुषांची जयंती उत्सव साजरे करणे इत्यादींसाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|
| 1001-29/7/2013 | 35000 | श्री. अशोक साठे यांना आण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यासाठी आदा |
| 1-2/4/2013 | 20000 | श्री. शामराम भिमराव खरात यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यासाठी आदा. |
| 29-8/4/2013 | 130000 | नगरपरिषद कर्मचारी संघातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करणेसाठी तसलमात आदा. |

वरीलप्रमाणे जयंती उत्सव साजरे करण्यासाठी रक्कम आदा झाली आहे . लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र . 100 दिनांक 26/5/2015 अन्वये खालील परीच्छेदांबाबत उत्तर मागविले होते . मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे .

महाराष्ट्र नगररिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील नियम

49(3)ब नुसार महापुरुषांच्या जयंती व उत्सवावर
खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

1. आण्णाभाऊ साठे जयंतीसाठी अदा रकमेचे समायोजन उशिराने करण्यात आले. दि. 29/07/2013 रोजी आदा तसलमातीची खर्च देयके दि. 2/4/2014 रोजी म्हणजेच 8 महिने कालावधीने करण्यात आले. तसेच डॉ. आंबेडकर जयंतीसाठी दि. 2/4/2013 व दि. 8/4/2013 रोजी घेतलेल्या रकमेचे समायोजन दि. 31/3/2014 अखेर करण्यात आलेले नाही.

2. श्री. अशोक साठे आणि श्री. शामराव खरात यांना अनुक्रमे अण्णाभाऊ साठे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी वैयक्तिकरित्या रक्कम अदा केली आहे.

3. नगरपरिषद कर्मचारी संघाला रु. 130000 अदा केले आहेत. सदर संस्था नोंदणीकृत आहे काय? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगररिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील नियम 49(3)ब नुसार झालेल्या खर्चास नगरपालिका ठराव तसेच मा. जिल्हाधिकारी यांची मंजूरी घ्यावी अन्यथा सदर खर्च वसूलात आणणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे मुद्दयांची पुर्तता होण्यासाठी रक्कम रु. 185000 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

## *16 श्रीमंत छत्रपती शाहू कलामंदीर येथे रंगकाम करणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

**गुंतलेली रक्कम रु. 548611.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 499076.00/-**

**वसूलपात्र रक्कम रु. 49535.00/-**

***अंदाजपत्रकापेक्षा प्रत्येक बाबीवर कमी/जादा खर्च केला आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता नियमबाहयपणे जादा खर्च केला आहे.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | श्रीमंत छत्रपती शाहू कलामंदीर येथे रंग काम करणे |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव क्र. 997 दि. 26/11/2009 (रक्कम रु. 500000) |
| 3 | तांत्रिक मंजूरी | नगर अभियंता सातारा क्र. 98 दि. 9/1/2014 |
| 4 | अंदाजपत्रकीय | 499076 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | | | |
| 5 | ठेकेदाराचे नांव | चेअरमन कासाईदेवी मजूर सह. संस्था मर्या. अधवली, ता. जावली,जि. सातारा | | |
| 6 | कामाचा आदेश | जाक्र.साशन/साबां/2029/ दि. 22/01/2014 | | |
| 7 | काम सुरु दिनांक | 22/1/2014 | | |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 27/1/2014 | | |
| 9 | मोजमाप नोंदवही क्र. | 49 | | |
| 10 | | प्रमाणक क्र. व दि. | रक्कम रु. | अंतिम देयक |
| | | 2540-12/2/2014 | 548611 | पहिले व अंतिम |

लेखापरिक्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र .107 दि . 26/5/2015 अन्वये संबंधीत संस्थेस खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते .मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक रु. 499076 आहे. मे. चेअरमन कासाईदेवी मजूर सह. संस्था लि. अधवली, ता. जावली यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूर आहे. तरीही प्रत्यक्ष खर्च रु. 548611 झाला आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्र. 997 दि. 26/11/2009 अनुसार रक्कम रु. 500000 एवढया रकमेची आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 कलम 72 नुसार "अ" वर्ग नगरपरिषद करीता स्थायी समिती वित्तीय मंजूरीची मर्यादा रु. 500000 आहे. यास्तव त्यापेक्षा जादा खर्च असल्याने नगरपरिषद सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे तथापि नगर परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता नियमबाहयपणे केलेला खर्च रक्कम रु. 548611-499076=49535 वसूल करणे आवश्यक आहे.
2) इमारतीच्या भिंतींना बाहेरील बाजूस रंगकामासाठी रु. 176580 इतक्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केली होती. अंदाजपत्रकानुसार मूळ परिमाण 764.19 वर्ग मीटर असून प्रत्यक्ष 2547.73 वर्ग मीटर काम केल्याची नोंद मोजमाप पुस्तकात आहे. 1783.54 वर्ग मीटर एवढे जादा कामाचा फरक कसा झाला, तसेच सदर वाढ abnormal वाटते. तसेच प्रत्यक्ष खर्च रु. 350975/- इतका झाल्याने अंदाजपत्रकापेक्षा जादा रु. 174395 जादा खर्च केल्याचा व वरील विसंगतीचा खुलासा करावा.
3) अंदाजपत्रकानुसार बाब क्रमांक 3 luster paint 1522.56 वर्गमीटर अपेक्षित होते. तथापि प्रत्यक्ष 901.64 वर्ग मीटर काम केलेआहे. 620.92 वर्ग मीटर काम कमी केले आहे. तरीही काम पूर्ण झाल्याचा दाखला का देण्यात आला आहे.
4) उपरोक्त उपपरिच्छेद क्र. 1 व 2 पहाता कामासाठी अंदाजापेक्षा कमी/जादा खर्च झालेला आहे. यास्तव महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 176 अनुसार सर्व तफावतींबाबत नगरअभियंता यांनी नमुना नं. 132 मध्ये त्याबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

उपरोक्त पुर्तता करेपर्यत रक्कम रु. 499076 आक्षेपाधिन व रक्कम रु. 49535 वसूलपात्र करण्यात आहे.

### *17 सि.स.नं. 82अ पंताचा गोट येथे चार सीट्स सार्वजनिक संडास बांधणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सुजलनिर्मल शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 450169.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 301446.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 148723.00/-

***जादा दराची निविदा मंजूरी केली आहे.Dewatering ची बाब समाविष्ट नसतांना खर्च केला आहे.***

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | सि .स.न . 82अ पंताचा गोट येथे चार सीट्स सार्वजनिक संडास बांधणे | | |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 689 दि. 18/6/2013 रक्कम रु. 338270/- | | |
| 3 | तांत्रिक मंजूरी | मा. कार्यकारी अभियंता मजीप्रा बांधकाम विभाग सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेशजा.क्र./चिशा/तां.मं./2404 दि. 7/9/2012 | | |
| 4 | अंदाजपत्रकीय रक्कम | 338270/- | | |
| 5 | ठेकेदाराचे नांव | श्री. संकेत संजय गायकवाड | | |
| 6 | कामाचा आदेश | जाक्र.सानप/साबां/1382/ दि. 30/9/2013 | | |
| 7 | कामसुरुदिनांक | 30/9/2013 | | |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 26/12/2013 | | |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 54 | | |
| 11 | | प्रमाणक क्र. व दि. | रक्कम रु. | अंतिम देयक |
| | | 3055-29/3/2014 | 450169 | प्रथम व अंतिम देयक |

लेखापरिक्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र .113 दि .26/5/2015 अन्वये संबंधीत संस्थेस खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते .मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

स्थायी समिती ठराव क्रमांक 863 दि . 17/9/2013 अनुसार 45.99% जादा दराची निविदा स्विकृत केली आहे .नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्र .36 दि . 29/12/2005 मधील अ .क्र . 45 अनुसार

नगरपरिषद सातारा

अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरीची शिफारस न करता फेर निविदा मागविण्याचे आदेश आहेत .तशी कार्यवाही न करता निविदा मंजूर केल्याने नगरपरिषदचे रक्कम रु .136136 चे नुकसान झाले आहे . सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 162 व 167(2) अनुसार मूळ अंदाजपत्रकामध्ये 10 % पेक्षा जास्त वाढ होण्याची शक्यता असेल तेव्हा सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

मोजमाप पुस्तक क्रमांक 54 मधील पान क्रमांक 227 ते 230 वर सलगपणे मोजमापे अंतिम बिलाची नोंदली आहेत. वास्तविक पहाता कामे जसजशी होतील त्या त्या प्रमाणात टप्प्याटप्प्याने मोजमाप घेऊन तशी मोजमाप पुस्तकात नोंदणे आवश्यक असता तशी कार्यवाही केली जात नाही.

जुने शौचालय जेसीबी मशिनने पाडल्याचे व त्यावर रु. 4800/- खर्च दर्शवित आहे. तथापि त्या मधून निघालेला माल दूरवर नेल्याचा खर्च दिसून येत नाही.

जादा बाब म्हणून Dewatering including pumping out water ची मोजमापे खालील प्रमाणे आहेत.

110X114.43=12587.30 रुपये

सदरबाब अंदाजपत्रकात समाविष्ट नसतांना काय आधारे नोंद घेतली तसेच पंपाचे लॉगबुक ठेवले नाही. सबब झालेला खर्च 12587.30 अंतिम अमान्य करण्यात येत आहे. सदर रक्कम शासन सदरी भरणास करुन आक्षेपाची पूर्तता होणे आवश्यक आहे.

कामाचे आदेशात नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावला नाही .

उपरोक्त पुर्तता करेपर्यत रक्कम रु. 301446/- तात्पुरती अमान्य व रु 148723 अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATENSM5901 (RefNo : 66, Hmm No . 113)

## *18 वॉर्ड क्रमांक 9, 101 कामाठीपुरा येथील सार्व. संडासची दुरुस्ती करणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 न.पनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 19482.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19482.00/-

| |
|---|
| ***1. मुदतबाहय मागणीस सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.*** |

नगरपरिषद सातारा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | वॉर्ड क्रमांक 9, 101 कामाठीपुरा येथील सार्व. संडसची दुरुस्ती करणे. | | |
| | लेखाशिर्ष | दु. घटक | | |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | सार्वजनिक बांधकाम समिती सभा दिनांक 18/7/2009 ठराव क्रमांक 1692 | | |
| 3 | तांत्रिक मंजूरी | आवश्यकता नाही | | |
| 4 | अंदाजपत्रकीयरक्कम | वार्षिक दर सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 373 दिनांक 30/5/2008 | | |
| 5 | ठेकेदाराचे नांव | दिपक सुरेश जाधव | | |
| 6 | कामाचा आदेश | जाक्र.सानप/साबां/251/ दि. 23/7/2009 | | |
| 7 | कामसुरुदिनांक | 23/7/2009 | | |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 20/8/2009 | | |
| 9 | कामाची मुदत | 30 दिवस | | |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 23 पानक्रमांक 197 | | |
| 11 | | प्रमाणक क्र. व दि. | रक्कम रु. | अंतिम देयक |
| | | 2892-20/3/2014 | 19482 | |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र.116 दि .26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही नमूद आक्षेप खालीलप्रमाणे त्यामुळे . .आहे येत करणेत

1) सदर काम दिनांक 20/8/2009 रोजी पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्र. 45 अनुसार मुदत सिमांकनसंबंधीत कायद्यातील तरतुदीनुसार मुदतबाहय झालेल्या मागण्या सामान्यत: **नाकारण्यात** आल्या *पाहिजेत* आणि अशा कालबाहय झालेल्या बाबींच्या मागणीचे प्रदान परिषदेच्या **मंजूरीविना** देण्यात येऊ नये. याबाबतीत प्रत्येक बाबींच्या गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात यावा अशी तरतूद आहे. सदर मागणी मुदतबाहय असल्याने नगरपरिषद सर्वसाधारणसभेची मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी मान्यता घेण्यात आली नाही. यास्तव नियम 45 चा भंग झाला आहे. सबब रक्कम रु. 19482 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

***19 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजना कामासाठी Transit कॅम्प तयार करणे कामी जागा लेवल, माती वाहतुक करणे.***

**00**

नगरपरिषद सातारा

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 400000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 400000.00/-

***तांत्रिक मंजूरी नसतांना कामाचे आदेश देऊन काम पूर्ततेनंतर तांत्रिक मंजूरी प्राप्त केली आहे. शासन परिपत्रक दि: 10/10/2008 चे उल्लघन करुन पुनर्प्रत्यायी आदेश दिले आहेत.***

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजना कामासाठी ---------- कॅम्प तयार करणेकमी जागा लेवल , माती वाहतुक करणे . | |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव नं. 601 दि. 29/4/2013 | |
| 3 | तांत्रिक मंजूरी | जा.क्र. 473 दि. 13/2/2014 | |
| 4 | अंदाजपत्रकीयरक्कम | 400000 | |
| 5 | ठेकेदाराचे नांव | रणजित अरुण घोरपडे | |
| 6 | कामाचा आदेश | जाक्र.साशन/साबां/766/ दि23/5/2013 | |
| 7 | कामसुरुदिनांक | 23/5/2013 | |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 26/7/2013 | |
| 9 | कामाची मुदत | 60 दिवस | |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 49 पानक्र. 174 | |
| 11 | प्रमाणक क्र. व दि. | 2890-20/3/2014 | रक्कम रु. 400000 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 117 दि .26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही नमूद आक्षेप खालीलप्रमाणे त्यामुळे . .आहे येत करणेत

1) तांत्रिक मान्यता आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदेश क्रमांक चिशा/तां.मं./473/2014 दि. 13/2/2014 रोजीचा असून दि. 4/3/2014 रोजी न.पा. स प्राप्त झालेला आहे. तांत्रिक मंजूरी प्राप्त नसतांना कामाचा मक्तेदार निवड करुन नियमबाहयपणे दिनांक 23/5/2013 रोजी कामाचे आदेश दिले आहेत.

2) सदर प्रकारच्या कामाचे दर करार सन 2009-10 मध्ये केला आहे. त्यासाठी दै. सकाळ दिनांक 24/7/2009

मध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. प्राप्त तीन निविदांपैकी श्री . रणजीत अरुण घारेपडे यांची 4.99% जादा दराची सर्वात कमी दर असल्याने सर्वसाधारण सभा दि. 31/8/2009 ठराव क्रमांक 775 ने निविदेस मंजूरी दिलेली आहे. त्याआधारे स्थायी समिती ठराव क्रमांक 601 दि. 29/4/2013 अन्वये दरास मंजूरी दिली असून त्यानुसार कार्यादेश देण्यात आला आहे. महराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांसख-2008/प्रक्र.256/08/उद्योग 4 दि. 10 ऑक्टोबर 2008 अनुसार सर्व साधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकरणाच्या मते करारास, मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावली नुसार संबंधीत विभागासी सल्ला मसलत केल्यानंतरच योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार कार्यवाही न करता नियमबाहयपणे पुनर्प्रत्ययी आदेश दिले आहेत.

उपरोक्त 1 व 2 बाबींची पुर्तता हाईपर्यंत रक्कम रु. 400000/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

## *20 वॉर्ड क्रमांक 32 पेठ शनिवार बागवान घर ते शेख घर अखेर गटर करणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 न.प.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

**गुंतलेली रक्कम रु. 134879.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 80610.00/-**

**वसूलपात्र रक्कम रु. 54269.00/-**

***कामाची मोजमापे पहाता खालील 4 नमुद केलेल्या बाबी अंदाजपत्रकात नमूद नसतांना ठेकेदारास रकमा आदा केल्या आहेत.अंदाजपत्रकापेक्षा 27% जादा दराने निविदा मंजूर केली आहे तथापि सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेण्यात आली नाही.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | वॉर्ड क्रमांक 32 पेठ शनिवार बागवान घर ते शेख घर अखेर गटर करणे |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | सर्व साधारण सभा ठराव क्रमांक1823 दि. 13/5/2011 |
| 3 | तांत्रिक मंजूरी | एजेपी 1694-20/7/2011 |
| 4 | अंदाजपत्रकीयरक्कम | 138858 |
| 5 | ठेकेदाराचे नांव | शैलेशकुमार चं. शिंदे |
| 6 | कामाचा आदेश | जाक्र.सानप/1804/ दि. 5/12/2013 |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | कामसुरुदिनांक | 5/12/2013 | |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 20/1/2014 | |
| 9 | कामाची मुदत | 60 दिवस | |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 67 | |
| 11 | प्रमाणक क्र. व दि. | 3117-29/3/2014 | रक्कम रु. 134879/- |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 118 दिनांक 26/5/2015 अन्वये संबंधीत संस्थेस खालील नमूद केल्याप्रमाणे आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमास पत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1) कामाची मोजमापे पहाता खालील बाबी मूळ अंदाजपत्रकात नमूद नाहीत.

| अ.क्र . | तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | P/L 300mm RCC Pipe | 11.70(RMT) | 811.03 | 9489.05 |
| 2 | P/L Brick masonary chamber | 6(No.) | 3432.86 | 20597.16 |
| 3 | P/S RCC Lofts of 3" Thik | 18.90 (sqm) | 719.12 | 13591.36 |
| 4 | Providing and fabricating structural steel work | 0.15 (MT) | 70141.87 | 10591.42 |
| | | | | 54268.99 |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 167 अनुसार सक्षम मंजूरी घेण्यात आली नाही . सदर रक्कम रु. 54269/- वसूल करुन न .पा . निधीमध्ये भरणा करुन पुर्तता दाखवावी .

2) श्री . शैलेशकुमार चं . शिंदे यांची सर्वात कमी दराची निविदा 27% जास्तदराने मंजूर केली आहे . स्थायी निदेश क्र . 36 दि . 29/12/2005 मधीलअ .क्र . 45 नुसार अंदाजपत्रकापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरीची शिफारस न करता फेर निविदा मागविण्याचे आदेश असतांना तशी कार्यवाही केली नाही तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 162 व 167(2) अनुसार मूळ अंदाजपत्रकामध्ये 10 % पेक्षा जास्त वाढ होण्याची शक्यता असेल तेव्हा सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

उपरोक्त पुर्तता करेपर्यंत रक्कम रु. 54269 वसूलपात्र व रक्कम रुपये 80610 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

नगरपरिषद सातारा

## 21 *नळ पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :- न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 33535232.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 33535232.00/-

***1. नळ पाणी पुरवठा योजना प्रचंड तोटयात आहे.2. मीटर पध्दत वापरणे गरजेचे आहे.3. सामान्य पाणीपट्टी वसुली केली जात नाही.4. थकबाकी जादा आहे.5. कर्जाचे दायित्व जादा आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र.121 दि .26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही . त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करणेत येत आहे.

नगरपरिषदेची स्वत:ची नळपाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेचे लेखापरीक्षण करता आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नळपाणी पुरवठा योजनेची सन 2011-12 ते 2013-14 मधील जमा व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र . | वित्तीय वर्ष | खर्च | जमा | जादा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 28677557 | 19121741 | 9555816 |
| 2 | 2012-13 | 35585361 | 22259867 | 13325494 |
| 3 | 2013-14 | 33535232 | 20756939 | 12788293 |
| | एकूण | 97798150 | 62138547 | 35659603 |

सरासरी तूट रक्कम रु . 11886534

वरीलप्रमाणे मागील तीन वर्षाची आकडेवाडी पहाता जमेपेक्षा खर्च जादा झाल्याचे दिसून येते. उपरोक्त तीन वर्षात मिळून रक्कम रु. 35659603 इतका तोटा झालेला आहे. म्हणजेच वार्षिक सरासरी रक्कम रु. 11686534 चा तोटा होत आहे. त्यामुळे योजना स्वयंपूर्ण नसून प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे. खर्चात काटकसर करुन तसेच वसुलीचे प्रमाण वाढवून योजना स्वयंपूर्ण करण्याकडे नगरपरिषदेने लक्ष पुरविणे गरजेचे आहे. अन्यथा आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होणार आहे. याची नोंद घ्यावी.

2. महाराष्ट्र शासन, नगर विकास, मुंबई अधिसुचना दि. 1/4/1997 अनुसार विशेष पाणीपट्टी कराचे दर ठरविले असून मीटर वापर केल्यास लिटरप्रमाणे पाणी आकारणी करण्याचे दरही दिलेले आहेत. शहराच्या काही भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणही मीटर बसवून पाणी वापरावर पाणीपट्टी आकारणी करते. त्याच पध्दतीने पाण्याच्या वापराचे मोजमाप मीटरने केल्यास पाण्याचा अपव्यय टाळला जाईल. तसेच पाणीपट्टीत वाढ होऊन योजना स्वयंपूर्ण होण्यासाठी मदत होईल.

3. नगरपरिषद हद्दीत 30699 मिळकती असून नळ कनेक्शन संख्या 13507 आहे. म्हणजेच 17192

मिळकतधारकांकडून पाणीपट्टी कर वसुल केला जात नाही. त्यांचेकडून महाराष्ट्र नगरपालिका, नगरपरिषदा व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 मधील नियम 105(2) अनुसार नगरपरिषदेने आपल्या हद्दीतील मिळकतधारकांकडून सामान्य पाणीपट्टी कर वसुल केला पाहिजे. तथापि तशी कार्यवाही न केलेने नगरपरिषदेचे नुकसान होत आहे.

4. नगरपरिषद हद्दीत 175 विंधन विहीरी असून सदर विंधन विहीरीवर हातपंप आहेत. त्यामुळे सामान्य पाणीपट्टी कर वसुली करुन तूट भरुन काढणे गरजेचे आहे.

5. पाणी पुरवठा योजनेवर अद्याप रु. 21581000 कर्ज असून त्याची परतफेड करणेसाठी मुद्दल + व्याजाची रक्कम खर्च होत आहे. सदर दायित्व कमी करणे गरजेचे आहे.

6. पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम रु. 15243620 इतकी आहे. नियम अधिनियमातील तरतूदींचा वापर करुन सदर रक्कम वसुली करण्याचे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

7. शहराच्या काही भागास पाणी पुरवठा करतांना नगरपरिषद ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा यांचेकडून कृष्णा उद्भवापासून उपसा केलेले पाणी विकत होते. सदर पाणी बिलाची थकबाकी रक्कम रु. 49178645 इतकी आहे. सदर रकमा वेळेवर भरल्या नसल्याने त्याचे व्याज व दंड आकारणी होत आहे. तसेच सदर रकमेच्या बिलाची नोंदवही नसल्याने प्रत्यक्ष पाणी किती विकत घेतले व त्याची आकारणी बरोबर असल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे रक्कम योग्य असल्याची खात्री होत नाही. त्याचप्रमाणे सदर दायित्वच कमी करणे गरजेचे आहे.

8. अनधिकृत पाणी कनेक्शन शोधून बंद करण्याची मोहिम सुरु करणे, पाणी गळती, पाणी चोरी शोधून प्रतिबंधात्मक कारवाई करावी. योजना तोटयात असल्याने कमाल कर आकारणी करणे इत्यादी उपाय करणे आवश्यक आहे.

DATMSSM5561 (Ref No : 74, Hmm No : 121)

## *22 हायप्रेशर सोडियम व्हेपर दिवे खरेदी खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : विद्युत विभाग न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2718834.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1962042.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 756792.00/-

***1. नियमबाहयपणे REPEAT ORDER देण्यात आलेली आहे. 2. ई निविदा प्रक्रिया अवलबणे अनिवार्य असतानाही ती राबविली नाही.3. DSR दरापेक्षा जादा दराने खरेदी केली आहे.4. अंशतः प्रदान रकमा मंजूरीविना आदा केल्या आहेत.***

नगरपरिषद सातारा

| अ.नं . | प्र .क्र . | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 285 | 9/5/2013 | 150331 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग -17 |
| 2 | 593 | 19/6/2013 | 300000 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग -60 |
| 3 | 609 | 29/6/2013 | 230500 | |
| 4 | 795 | 2/7/2013 | 300000 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग -57 |
| 5 | 809 | 6/7/2013 | 254942 | |
| 6 | 1062 | 6/8/2013 | 148430 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग 10 |
| 7 | 2012 | 27/11/2013 | 154382 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग 74 |
| 8 | 2076 | 4/12/2013 | 300000 | |
| 9 | 2236 | 8/1/2014 | 500000 | |
| 10 | 2474 | 5/2/2014 | 380249 | 150 वॅट सोडियम व्हेपर दिवे नग -43 |
| | | एकूण | 2718834 | |

नगरपरिषदेने वरील प्रमाणकान्वये सोडियम व्हेपर दिवे खरेदीसाठी मे . श्री . इलेक्ट्रीकल्स भरतगांव यांना रक्कम आदा केली आहे . सदर खर्चाचे लेखापरी क्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र.122 दि .26/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही.आहे येत करणेत नमूद आक्षेप खालीलप्रमाणे त्यामुळे .

1. विद्युत साहित्य खरेदीसाठी सन 2009-10 मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यानुसार मे. श्री. इलेक्ट्रीकल्स , भरतगांव यांची निविदेस जनरल कौन्सिल ठराव क्रामंक 761 दिनांक 21/8/2009 चे ठरावान्वये मंजूरी दिलेली होती. त्याच पुरवठादाराकडून आणि दरानुसार सन 2009-10 ते 2012-13मध्ये खरेदी केली असून सन 2013-14 मध्ये सुध्दा विद्युत साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यत आवश्यक बाबींसाठी मागील पुरवठादाराकडून मंजूर दराने खरेदी प्रक्रिया करण्यास जनरल कौन्सिल ठराव क्रमांक 3 दिनांक 26/4/2013 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन, अद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांसख - 1088/(2512)/उद्योग-6 दिनांक 2/1/1992 मधील परि. क्र. 8.3 (परिशिष्ट 7) अनुसार निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्यास पुनर्प्रत्यायी आदेश (REPEAT ORDER) देण्याबाबत तरतूद आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी सन 2009-10 नंतर 4 वर्षाचा कालावधी लोटलेला असूनही निविदा प्रक्रिया न राबविता सन 2009-10 चे निश्चित केलेले दर व पुरवठादार यांचेकडून खरेदी केल्याने सदर बाब उपरोक्त शासन आदेशाचे उल्लंघन करणारी आहे.

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांसख-2008/प्रक्र256/08/उद्योग-4 दि. 10/10/2008 नुसार सर्वसाधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ

देण्यात येऊ नये. तसेच अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिका-याच्या मते करारास मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावलीनुसार संबंधीत विभागाशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही करावी असे स्पष्ट नमूद असतांना नगरपरिषदेने विभागाची परवानगी न घेता नियमबाहयपणे सन 2013-14 वर्षात रु. 2718834/- एवढा खर्च केला आहे.

2. सन 2009-10 च्या निविदा प्रक्रियेस 2013-14 अखेर मुदतवाढ दिल्याने ई निविदा प्रक्रियेचा अवलंब झाला नाही. वास्तविकपणे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2012/ प्रक्र273/39 दि. 19/1/2013 अनुसार 1 फेब्रुवारी 2013 पासून 10 लाखावरील खरेदीसाठी ई निविदा प्रक्रियेचा अवलंब अनिवार्य करण्यात आलेला आहे. तथापि, नगरपरिषदेने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. यास्तव झालेला संपूर्ण खर्च रु. 2718834 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3. सार्वजनिक बांधकाम विभाग (इलेक्ट्रीकल) ची सन 2013-14 ची दरसूची नुसार खालीलप्रमाणे दर निश्चित करणे आवश्यक होते.

| अ.क्र . | DSR मधील बाब क्रमांक | तपशिल | दर |
|---|---|---|---|
| 1 | 2.8.22 | Supplying and erecting floodlight luminary suitable for 150 watt HPSV Lamp camplete with accessories on provided bracket | 5417 |
| 2 | 2.1.41 | S/E HPSV Lamp watt | 618 |
| | | एकूण | 6035 |

सदर साहित्यासाठी रु. 6035 प्रतिनग दर निश्चिती होते तथापि नगरपरिषदेने रु. 8843 प्रतिनग प्रमाणे रक्कम आदा केली आहे. म्हणजेच प्रतिनगास रु. 2808/- जादा आदा केले आहे. यास्तव एकूण खरेदी नग 261 चे रक्कम रु. 732888 जादा आदाई झाली आहे. ती संबंधीतांकडून वसुली करणे आवश्यक आहे.

4. सदरची आदाई सन 2009-10 चे मंजूर दरानुसार झाली असल्याने सन 2009-10 ते 2012-13 पर्यंत झालेला खर्च त्या त्या वर्षाच्या दरसूचीनुसार तपासून वसुल करणे आवश्यक आहे.

5. सोडियम व्हेपर दिवे बसविण्यासाठी सपोर्ट पाईप क्लॅम्प चा दर स्वतंत्र रु. 498/- प्रतिनग आहे. सदर पाईपची साठा नोंद पृ.क्र. 179 वर 48 नग जुने दिवे शिफ्ट करण्यासाठी वापरल्याची नोंद आहे. तथापि ते कोठे बसविले याचे स्थान व बसविलेबाबत अहवाल इत्यादी तपशिल उपलब्ध नसल्याने योग्य विनियोगाबावत पडताळणी करता आली नाही. यास्तव 48 नगाचे रु. 498/- प्रमाणे रु. 23904/- वसुल

करणे आवश्यक आहे.

6. खालील प्रमाणकांच्या रकमा पूर्ण रकमेपैकी अंशत: प्रदान आहे.

| अ.क्र . | प्र .क्र . | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 593 | 19/6/2013 | 300000 |
| 2 | 795 | 2/7/2013 | 300000 |
| 3 | 1062 | 6/8/2013 | 148430 |
| 4 | 2012 | 27/11/2013 | 154382 |
| 5 | 2076 | 4/12/2013 | 300000 |
| 6 | 2236 | 8/1/2014 | 500000 |

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 17 अनुसार प्रदानार्थ मंजूरी आवश्यक आहे. तथापि उपरोक्त प्रमाणके पहाता त्यावर मंजूरी दाखल स्वाक्ष-या नाहीत. तरीही रकमा नियमबाहयपणे आदा केल्या आहेत.

7. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 19 अनुसार प्रदानाबावत पोहोचपावती घेणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त प्रदानाची पोहोच नसल्याने संबधितांस रकमा प्राप्त झाल्याची खात्री होत नाही. पोहोचपावती प्राप्त करुन पुर्तता दाखवावी.

उपरोक्त पुर्तता करेपर्यंत रक्कम रु. 1962042 आक्षेपाधिन तर रक्कम रु. 756792 वसुलपात्र करण्यात येत आहे.

[illegible] (Ref No : 75, Item No : 122)

## *23 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत (IHSDP) योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाबाबत व इतर पायाभूत सुविधा खर्चाबाबत.*

**IHSDP**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 22**

*लेखा शीर्ष :00 शासन / न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 122572322.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 23052450.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 99519872.00/-

***1. निवडलेले लाभार्थी अटीमध्ये बसतात काय याची खात्री होणे आवश्यक आहे.2. लाभार्थी निवड प्रक्रिया महसूल यंत्रणेच्या नियंत्रणाखाली करणे आवश्यक होते.3. लाभार्थ्यांकडून अंशदान वसूली केली नाही.4. प्रत्येक लाभार्थ्यांचे स्वतंत्र बँक खाते उघडले नाही.5. शासनामार्फत वितरीत निधी तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ***

| |
|---|
| ***अखर्चित राहिल्याने पीएलआर नुसार व्याज आकारणी करणे आवश्यक आहे.6. निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिकात देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.7. निविदा मंजूरी करतांना महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 167(2) चा भंग झालेला आहे.8. जागेच्या मालकी हक्काची कागदपत्राअभावी खात्री होत नाही.9. सर्व कामे अपूर्ण आहेत.*** |

केंद्र शासनाच्या शहर विकास तसेच शहरी रोजगार पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावण्याचा एक भाग म्हणून घोषित झोपडपट्टयांमध्ये राहणा-या तसेच झोपडपट्टयांतील आरोग्यास उपायकारक अशा परिस्थितीत राहणा-या झोपडपट्टी वासियांचेसाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमम (IHSDP) मा. पंतप्रधान यांनी दिनांक 3/12/2005 रोजी जाहीर केला आहे.
सदर कार्यक्रमानुसार झोपडपट्टीचा विकास एकसंघ पध्दतीने करणे व पर्याप्त निवारा व मूलभूत सोयीसुविधा झोपडपट्टीतील रहिवाश्यांना उपलब्ध करुन देऊन, शहरातील झोपडपट्टीवासियांचे राहणीमान सुधारणे व त्याद्वारे जीवनमान सुखावह करुन सभोवतालची परिस्थिती सुधारणे हे या कार्यक्रमाचे मूलभूत उद्दीष्ट आहे. यास्तव सदर योजनेची अंमलबजावणी राज्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक जनेयो-2006/प्रक्र46/ग्रनिधी-2 दि. 25/6/2007 अनुसार मार्गदर्शक तत्वे व अंमलबजावणीचे निकष तयार करण्यात आले असून सदर योजनेअंतर्गत सातारा नगरपरिषद सातारा यांना 1473 घरकुलांना मंजूरी दिलेली आहे.
प्रशासकीय मान्यता- Under Secy to G.O.I. Ministry of Housing and Urban Poverty Alloviation Memorandum number N11028/1/2011/HSDP/JNNURM-Vol XIII Dated 27/6/2011.
तांत्रिक मंजूरी - कार्यकारी अभियंता-1 पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचे आदेश क्र. जा.क्र.पुमं/कार्यकारी अभियंता/1/1434/11 दि. 17/9/2011 रु. 3470.22 लाख

ठेकेदाराचे नांव - मे. बी.व्ही. जी. (इंडिया) लिमीटेड

कामाचा आदेश - दिनांक - 22/2/2013

कामाची मुदत - 12 महिने

काम पूर्ण दिनांक - सर्व कामे अपूर्ण आहेत.

लेखापरीक्षण कालावधी सन 2013-14 वर्षात झालेला खर्च खालीलप्रमाणे

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 59 | 15/4/2013 | 4187059 |
| 2 | 60 | 15/4/2013 | 3205523 |
| 3 | 462 | 28/5/2013 | 6108743 |
| 4 | 761 | 28/6/2013 | 5423909 |
| 5 | 1140 | 19/8/2013 | 10587851 |
| 6 | 1174 | 26/8/2013 | 1792143 |
| 7 | 1620 | 15/10/2013 | 12930807 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | 1762 | 29/10/2013 | 16416527 |
| 9 | 1764 | 2/1/2014 | 8873129 |
| 10 | 2142 | 2/1/2014 | 738031 |
| 11 | 2143 | 2/1/2014 | 5427806 |
| 12 | 2144 | 2/1/2014 | 78820 |
| 13 | 2145 | 2/1/2014 | 8380691 |
| 14 | 2469 | 3/2/2014 | 1415869 |
| 15 | 2538 | 12/2/2014 | 24900628 |
| 16 | 3062 | 29/3/2014 | 11394792 |
| | | एकूण | 122572322 |

सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. जनेयो 2006/प्र.क्र. 46/गृनिधी-2/ दिनांक 25/6/2007 च्या उपपरिच्छेद 11.2 प्रमाणे केंद्र शासनाच्या सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना दि. 1/1/1995 च्या पात्र झोपडपट्टी धारकांना सामावून घेण्याचे तसेच उपपरिच्छेद क्रमांक 11.18 अनुसार सदर लाभार्थ्यांनी केंद्र व राज्य शासन पुरस्कृत गृहनिर्माणाशी संबधीत योजनेचा लाभ घेतलेला नसावा किंवा त्याची इतर कोणत्याही घराची मालकी नसावी. अशा स्पष्ट सुचना आहेत. सबब नगरपालिकेने निवडलेले लाभार्थी वरील अटींमध्ये बसतात काय? याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

2. सर्वसाधारण सभा दिनांक 14/12/2010 ठराव क्रमांक 1096 अनुसार सदर योजनेअंतर्गत 1473 घरकुलांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास व खर्चास मान्यता देणेबाबत करण्यात आलेला आहे. तथापि सातारा शहरामध्ये कोणत्या झोपडपट्टीसदृश्य वसाहती आहेत व कोणत्या लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा आहे याबाबत उल्लेख नाही. तसेच सदर योजना मंजूरीनंतरही पात्र लाभार्थ्यांची यादी सादर करुन त्यास नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थी निश्चित नसल्याचे स्पष्ट होते.

3. झोपडपट्टी सदृष्य वसाहती या महसूल यंत्रणेमार्फत नियंत्रित केल्या जातात. सदर वसाहती झोपडपट्टी असल्याची महसूल यंत्रणेकडून प्रमाणीत करण्यात येऊन तसेच लाभार्थी निवड प्रक्रिया महसूल खात्याच्या नियंत्रणाखाली करणे आवश्यक होते. तथापि तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाचे उपरोक्त दिनांक 25/6/2007 चे शासन निर्णय मधील परिच्छेद क्र. 11.10 नुसार योजनेची अंमलबजावणी करतांना सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांकडून 12% तर अजा/अज/मागासवर्गीय/इमाव/शारीरीक अपंग आणि इतर दुर्बल घटक या प्रवर्गातील लाभार्थ्यांकडून 10% इतके अंशदान द्यावयाचे आहे. सदर रक्कम संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांनी वसूल करावयाची आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे लाभार्थी अंशदान वसूली होणे आवश्यक होते.

| अ.क्र. | प्रवर्ग | लाभार्थी | घरकुल किमत | लाभार्थी अंशदान | एकूण लाभार्थी अंशदान |
|---|---|---|---|---|---|

नगरपरिषद सातारा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण | 459 | 147313 | 17678 | 8114202 |
| 2 | दुर्बल घटक | 1014 | 147313 | 14732 | 14938248 |
| | | | | एकूण | 23052450 |

वरीलप्रमाणे एकूण 23052450 लाभार्थी अंशदान वसूली होणे आवश्यक होते. तथापि अद्याप अंशदान वसूली केली नाही. अद्याप रु. 23052450 इतकी रक्कम वसूली बाकी आहे. त्यामुळे दरवर्षी व्याजाची 8% प्रमाणे रु. 1844196 चे नुकसान होत आहे. यास्तव अंशदान रक्कम वसूलात आणून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी. तसेच लाभार्थी अंशदान रक्कम प्राप्त झाल्याशिवाय घरकुल ताब्यात न देण्याची दक्षता घ्यावी.

5. उपरोक्त दिनांक 25/6/2007 च्या शासन निर्णय मधील उपपरिच्छेद 12(4) व 12(5) प्रमाणे राज्यस्तरीय समन्वय समितीने तपशीलवार प्रकल्प अहवालास मान्यता दिल्यानंतर संबंधित नगरपरिषदेने प्रत्येक लाभार्थ्यांचे स्वतंत्र बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडून मूळ पासबुक स्वत:कडे ठेऊन साक्षांकित छायाप्रत संबंधित लाभार्थ्यांस द्यावयाची आहेत. त्याप्रमाणे स्वतंत्र पासबुक व लाभार्थीनिहाय नोंदवहीत नोंदी न केल्याने प्रत्येक लाभार्थ्याने त्याची हिश्याची किती रक्कम भरणा केली याची खातरजमा करता आली नाही. यास्तव लाभार्थी निहाय स्वतंत्र पासबुक व नोंदवही अद्यावत ठेवून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

6. शासन निर्णय दिनांक 25/6/2007 मधील परिच्छेद 11-14 अनुसार भाडेपट्टा अधिमुल्य व एकत्रित शुल्काची वसूली कार्यवाही केली नाही.

7. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 25/6/2007 अनुसार उपपरिच्छेद 11-16 नुसार योजना शासनाने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, ती मुदतीत पूर्ण झाली नाही. ब-1 निविदेमधील क्लॉज 2-अ नुसार मुदतीत काम पूर्ण न केल्यास दंडात्मक तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि तशी दंड वसूली करण्यात आली नाही.

8. अनुदान वितरणाची व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | प्राप्त अनुदान | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 130839500 | - |
| 2 | 2012-13 | - | - |
| 3 | 2013-14 | - | 122572322 |
| एकूण | | 130839500 | 122572322 |

उपरोक्त आकडेवारी पहाता अंदाजीत खर्चाचे प्रमाणे 41% असून ते सदर प्रमाण अत्यल्प असून महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन परिपत्रक क्र.जनियो-2009/प्रक्र128/ग्रनिधी2(सेल)मंत्रालय, मुंबई दिनांक 1 डिसेंबर 2009 अनुसार प्रस्तुत प्रयोजनासाठी शासनामार्फत वितरीत केलेला निधी 3 महिन्यांपेक्षा अधिक काळ विनावापर अखर्चित राहिला तर अशा निधीवर PLR (Prime Lending Rate) नुसार व्याज आकारणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी. तसेच अनुदान प्राप्त होताच ते खर्च केल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे. खर्च न करता प्रमाणपत्र पाठविल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

9. सदर कामासाठी निविदा प्रक्रिया राबवितांना खालीलप्रमाणे नऊ वेळा जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | दिनांक | वृत्तपत्र | निविदा मंजूरी न होण्याची कारणे |
|---|---|---|---|
| 1 | 10/10/2011 | महाराष्ट्र टाईम्स | 4 निविदा मागणी झाली. दोन फॉर्म खरेदी एकाही निविदाधारकाने निविदा भरली नाही. |
| 2 | 25/10/2011 | सामना | नगरपरिषद सार्वजनिक निवडणुक आचारसंहितामुळे निविदा भरली नाही. |
| 3 | 26/12/2011 | पुढारी | प्रतिसाद नाही. |
| 4 | 22/1/2012 | महाराष्ट्र टाईम्स | 37% जादा दराची निविदा असल्याने ठराव क्रमांक 138 नाकारण्यात आली. |
| 5 | 10/8/2012 | महाराष्ट्र टाईम्स | निविदा विक्री नाही. |
| 6 | 18/8/2012 | पुढारी | निविदा विक्री नाही. |
| 7 | 31/8/2012 | पुढारी | एक फॉर्म विक्री तथापि निविदा भरली नाही. |
| 8 | 12/9/2012 | पुढारी | विहीत वेळेत निविदा सादर नाही. त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली. |
| 9 | 29/9/2012 | पुढारी | निविदा मंजूर |

मंजूरी झालेली निविदा पहाता सदर घरकुलाचे बांधकामाबाबत जाहिरात दैनिक पुढारी दिनांक 29/9/2012 रोजी वृत्तपत्रात दिली आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 347022629 इतकी होते. सदर निविदा 1 कोटी वरील असल्याने नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. 36 नुसार कामाची जाहिर निविदा "अ" राष्ट्रीय स्तरावरील दैनिक "ब" राज्यस्तरीय दैनिक "क" 20000 प्रती खप असलेल्या जिल्हास्तरीय दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नसल्याने स्पर्धात्मक दराचा नगरपालिकेस फायदा झालेला नाही.

10. निविदा मंजूरीचे वेळी दिनांक 29/9/2012 रोजी जाहिर निविदा दै. पुढारी मध्ये प्रसिध्दी करण्यात आली असून निविदा विक्री कालावधी दिनांक 29/9/2012 ते 6/10/2012 असा आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस1088/(2512)/उद्योग6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद क्र. 8.3(अ) अनुसार निविदा प्रसिध्द झाल्यानंतर कंत्राटदारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवडयांचा कालावधी देणे आवश्यक आहे. तथापि कमी कालावधी दिलेला आहे. अपुरा कालावधी व स्पर्धा निर्मितीकडे दुर्लक्ष यामुळे कमी निविदा प्राप्त झाल्या व त्याही अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त दराच्या आहेत. मंजूर निविदा 33% जादा दराच्या असल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु. 347022629 चे 33% म्हणजेच रुपये 114517468 जादा अदा करावी लागणार आहे. सदर दराने प्रस्तावाची किंमत 46.15 कोटी इतकी होती. तसेच सदर जादा खर्चाबाबत सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सदर जादा खर्चाचा नगरपरिषदेवर भार पडणार नाही याबाबत नगरपरिषदेने

उपाययोजना करुन वाढीव निधीची रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्याशिवाय प्रदान करण्यात येवु नये असे पहावे.

11. मंजूर निविदा पहाता एकूण 8 कामासाठी एकच जाहिरात दिलेली असून त्यामध्ये प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा मागविल्या आहेत. त्याबाबतची कागदपत्रे पहाता आठही कामासाठी खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1. मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे
2. मे. पंधे इन्फ्रा कॉम प्रा. लि. सोलापूर

त्यांनी खालीलप्रमाणे बयाणा रकमेचे डिडि सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशील | मे. बि.व्ही. जी. इंडिया लि. | मे. पंधे इन्फ्रा कॉम प्रा. लि. |
|---|---|---|---|
| 1 | 56 अ केसरकरपेठ | डिडि क्रमांक 33016 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757492 दि. 27/9/2012 |
| 2 | सि.स.नं. 45 मंगळवारपेठ | डिडि क्रमांक 330018 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757493 दि. 27/9/2012 |
| 3 | 184अ गुरुवारपेठ | डिडि क्रमांक 33017 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757495 दि. 27/9/2012 |
| 4 | 38/105 केसरकरपेठ | डिडि क्रमांक 33015 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757496 दि. 27/9/2012 |
| 5 | 286 शनिवारपेठ | डिडि क्रमांक 33024 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757494 दि. 27/9/2012 |
| 6 | भिमाबाई आंबेडकर नगर | डिडि क्रमांक 33020 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757498 दि. 27/9/2012 |
| 7 | लक्ष्मी टेकडी | डिडि क्रमांक 33021 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757499 दि. 27/9/2012 |
| 8 | 278 रामाचा गोट | डिडि क्रमांक 33019 दि. 25/9/2012 | डिडि क्रमांक 757497 दि. 27/9/2012 |

वरील तपशिल पहाता मे. बी.व्ही. जी. इंडिया यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे शाखा चे डि डि सादर केले असून मे. पंधे इन्फ्रा कॉम प्रा. लि. सोलापूर यांनीही स्टेट बँक ऑफ इंडिया पुणे शाखेचे डि डि सादर केले आहेत. मे. पंधे इन्फ्रा कॉम यांचे कार्यालय सोलापूर येथे असतांना पुणे येथील डि डि सादर केल्याने साशंकता निर्माण होते. तसेच निविदा फॉर्म खरेदी पावती पहाता मे. वी.व्ही.जी. इंडिया लि. यांनी पावती क्रमांक 5091 दिनांक 4/10/2012 रु. 85000/- व मे. पंधे इन्फ्रा कॉम यांनी पावती क्रमांक 5092 दिनांक 4/10/2012 रु. 85000/- या सलगच्या पावत्यांद्वारे निविदा फॉर्म खरेदी केली आहे. तसेच सर्व निविदा पहाता 41.75 टक्के जादाची मे.बि. व्ही.जी. इंडिया यांची असून 42.25% जादाची मे. पंधे इन्फ्रा कॉम प्रा. लि. यांची

दिसून येते. त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष झाल्याचे लेखापरीक्षकाचे मत आहे.

12. मंजूर निविदाकार मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे नोंदणी प्रमाणपत्र पहाता ते कार्यकारी अभियंता पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी दिले असून नोंदणी वर्ग 1अ देण्यात आलेला असून अमर्याद लाखापर्यंत काम करण्याची पात्रता ठरविण्यात आली आहे. तसेच प्रमाणपत्राची मुदत 23/1/2015 पर्यंत देण्यात आली आहे. यास्तव सदर प्रमाणपत्र व नुतनीकरणाबाबत नगरपरिषदेने कार्यकारी अभियंता पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेकडे पडताळणी करणे आवश्यक होते तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

13. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रपीडब्ल्युएस1086/सीआर/249/बिल्डींग2/ दिनांक 5/11/1986 नुसार रुपये 50000/- वरील कामे बी-1 प्रकारच्या निविदा मागवून जास्तीत जास्त 5% दराने मंजूर करण्याचे स्पष्ट आदेश असतांना महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 167(2) चा आधार घेऊन निविदा 9.99% पर्यंत जादा दराने देता येतात. तरीही 33% जादा दराची निविदा नियमबाहयपणे मंजूर केली आहे.

लेखासंहिता नियम 185 प्रमाणे सरकारी बांधकामाची नियमपुस्तिका व्यवहार्य असेल तेथवर मार्गदर्शक म्हणून घेण्याची स्पष्ट तरतूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करुन स्पर्धात्मक दराचा लाभ न घेण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

14. निविदा मंजूरीचा दर 33% जादा दराची आहे. नगरपरिषद सचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील अ.क्र. 45 नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरीची शिफारस न करता फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी तरतूद असूनही निविदा मंजूरी होण्याच्या निविदा प्रक्रियेत तडजोड होणे अथवा संगनमताचे मंजूरी करण्याची शक्कल नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

15. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 16(1) नुसार नगरपरिषदेच्या कोणत्याही संविदेमध्ये नगरसेवकांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा नगरसेवक अपात्र ठरतो त्यामुळे नगरपरिषदेच्या कोणत्याही संविदेमध्ये नगरसेवक प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग नसल्याचा निविदाकाराकडून परिशिष्ट अ प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

16. सदर प्रकल्प ज्या जागेवर उभारण्यात आला त्या जागेची मालकी नगरपरिषदेची असणे आवश्यक आहे. तथापि, त्याबाबत कागदपत्रे उपलब्ध केली नसल्याने मालकी हक्काची खात्री होत नाही. कागदपत्राआधारे (नमुना नं. 7/12) मालकी हक्क प्रस्थापित असल्याची पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

17. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 139 अनुसार काम पूर्ण होईल तेव्हा नगर अभियंता यांनी नमुना क्रमांक 62 मध्ये पुर्णतेचा अहवाल अथवा प्रमाणपत्र लेखाप्रमुखाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा अधिक रकमेचे काम झाले असेल यास नगरअभियंता तरतूद वाढीव काम यांचे प्रमाणे, दर व कामाची किंमत यांच्यातील तफावतीची तुलना करुन त्याचे स्पष्टीकरण देईल. तथापि कामे अपूर्ण असल्याने तशी कार्यवाही केली जात नाही. कामे पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त तरतूदीचे पालन झाल्याची पुर्तता दाखवावी.

18. संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचे स्थायी निदेश क्रमांक 40 दिनांक 20/9/2006 मधील परिच्छेद 2(व) अनुसार वैशिष्टयपूर्ण कामे हाती घेतली असतील तर अशा कामांसाठी व्यवसायिक तांत्रिक सल्लागार कामाचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेऊन ठोक पध्दतीने दर मागविण्यात यावेत. असे आदेश आहेत. तथापि नगरपरिषदेने परसेंटेज पध्दतीने मोबदला मंजूर केला आहे. सदर बाब नियमबाहय आहे.

19. घरकुल पुर्ण झाल्यानंतर आवश्यक पूर्ततेनंतर संबधीत लाभार्थीस देऊन ताबा पावती घेण्यात यावी व सदर घराची आकारणी दक्षता घेण्यात यावी.

20. सदर प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

नगरपरिषद सातारा

| बाब | खर्च (लाखात) |
|---|---|
| नगरपालिका हिस्सा | 696.920 |
| लाभार्थी हिस्सा | 156.480 |
| केंद्र शासन हिस्सा | 2218.627 |
| एकूण | 3470.204 |
| राज्य शासन हिस्सा | 398.177 |
| +33% जादा निविदेनुसार | 1145.166 |
| एकूण | 4615.370 |

वरील आकडेवारी पहाता रु. 4615.37 लक्ष खर्च अपेक्षित असून अद्यापपर्यंत 1225.72 लक्ष इतका खर्च झाला आहे. त्यानुसार रक्कम रु. 3389.65 लक्ष उर्वरीत कामासाठी आवश्यक आहे. तथापि बँकेमध्ये 338 लक्ष इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यामुळे प्रकल्प पुर्णत्वासाठी अजूनही 3051.65 लक्ष इतक्या रकमेची आवश्यकता आहे. सदर रक्कम प्राप्त करण्याबाबतचे नियोजन असल्याचे दिसून येत नाही. तरी रक्कम रु. 3051.65 लक्ष चे नियोजन करुन त्याप्रमाणे काम पूर्ण करण्याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. पुर्तता दाखवावी.

21. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. जनेयो2006/प्र.क्र.46/गृनिधी-2/ दिनांक 25/2/2007 मधील परिच्छेद क्रमांक 11.15 अनुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता जिल्हयात पालकमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा गृहनिर्माण समितीची स्थापना करावयाची आहे. तसेच या समितीची बैठक प्रत्येक महिन्यात घेणे बंधनकारक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था यांनी मंजूर योजना केद्र शासनाने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे याबावत जिल्हा गृहनिर्माण समितीने स्वत: जातीने लक्ष देणे आवश्यक असून कार्यक्रमाची निश्चित केलेली मार्गदर्शक तत्वे निकष डावलून इतर कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. याची समितीने दक्षता घ्यावी व आवश्यकता भासल्यास जरुर तो प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावा. अशा सुचना असूनही अद्याप कामे अपूर्ण असल्याने योग्य ती कार्यवाही झालेली नाही.

22. एकूण आठ कामाची दि. 31/3/2014 स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | घरकुल संख्या | कामाचे आदेश दिनांक | पुर्ण करण्याची मुदत | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 56अ केसरकरपेठ | 32 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम चालू नाही |
| 2 | सि.स.नं. 45 मंगळवारपेठ | 32 | आदेश दिला नाही | - | काम चालू नाही |
| 3 | 184अ गुरुवारपेठ | 145 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम चालू नाही |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 38/105 केसरकरपेठ | 92 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम चालू नाही |
| 5 | 286 शनिवारपेठ | 44 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम अपूर्ण |
| 6 | भिमाबाई आंबेडकर नगर | 332 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम अपूर्ण |
| 7 | लक्ष्मी टेकडी | 748 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम अपूर्ण |
| 8 | 278 रामाचा गोट | 48 | 22/2/2013 | 21/2/2014 | काम अपूर्ण |

एकूण मंजूर कामांपैकी 1473 कामांपैकी 301 कामे अद्याप चालू नाहीत. उर्वरीत 1172 कामे चालू असून अपूर्ण आहेत. काम पूर्ण होण्याचे प्रमाणे अत्यल्प आहे. तसेच कामे विलंबाने होत आहेत. त्यामुळे इतर सुविधा रस्ते, पाणी, गटर इत्यादी कामे अपूर्ण आहेत. यास्तव घरकुलांचा ताबा देण्यात आलेला नाही. त्यामुळे शासकीय अनुदान विनाकारण गुंतुन पडलेले आहे. परिणामी कार्यक्रमाची अंमलबजावणी विहीत वेळेत व योग्य झाली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

वरील सर्व आक्षेपांच्या पुर्तता होईपर्यंत रक्कम रु. 99519872/- शासन अनुदानास तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे व रु. 23052450 वसुलपात्र करण्यात येत आहे.

## *24 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 90435000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 90435000.00/-

| |
|---|
| ***अभिलेखे उपलब्ध न केल्याने दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रानुसार लेखापरीक्षण न करणेबाबत शासन आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.*** |

1) सातारा नगरपरिषद, साताराचे सन 2013-14 चे लेखापरीक्षण करतेवेळी पाणी पुरवठा विभागाकडील अभिलेखे उपलब्ध करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 3 दिनांक 8/4/2015 नुसार सुचना देण्यात आलेली होती. सदर अभिलेख्यांपैकी UIDSSMT या योजनेअंतर्गत सुधारीत वाढीव सातारा पाणी पुरवठा योजना मंजूर असून सदर योजना ठेव तत्वावर राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे रक्कम

रु. 90435000 वित्तीय वर्ष सन 2013-14 मध्ये वर्ग करण्यात आली आहे. सदर योजनेच्या खर्चासंबंधी अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजूरी, निविदा नस्ती, मोजमाप पुस्तके, खर्च प्रमाणके व इतर संबंधीत नोंदवहया उपलब्ध करण्याबाबत अर्धसमासपत्र क्र. 61 दिनांक 8/5/2015 व अर्धसमासपत्र 79 दि. 18/5/2015 अनुसार लेखी विनंती करण्यात आली होती. तथापि याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 8 (मुख्य अधिनियम कलम 6(1)व 7(1)नुसार) दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) मुख्याधिकारी, नगरपरिषद सातारा यांचे जा.क्र.सानप/पापु/83(1) दिनांक 25/5/2015 या कार्यालयास दिनांक 6/8/2015 रोजी प्राप्त झाले असून त्यांनी कळविले आहे की, या योजनेसंबंधी सर्व निविदा प्रक्रीया ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा मार्फत राबविण्यात आली आहे. त्यामुळे त्यासंबंधीच्या सर्व फाईल्स त्या कार्यालयाकडे उपलब्ध आहेत. तसेच कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग सातारा यांचे जा.क्र.लेखा/सातारा/963/2015 दिनांक 22/5/2015 अनुसार "सदर विभागाचे लेखापरीक्षण खात्याचे अंतर्गत लेखाअधिकारी मुंबई यांचेमार्फत प्रत्येक वर्षी करण्यात येत असते. व महालेखाकार नागपूर/मुंबई यांचेमार्फत पाच वर्षानी लेखापरीक्षण करण्यात येत असते. त्यामुळे पुन्हा लेखापरीक्षण करणे उचीत ठरणार नाही व तशी पध्दत नाही. त्यामुळे मागणी केलेली कागदपत्रे देता येत नाहीत." असे नमूद केले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची अशी धारणा योग्य असल्याबाबत शासनाचे आदेश प्राप्त करणे आवश्यक आहे.

DATMSSM6801 (Ref No : 79, Hmm No : 126)

## *25 प्रभाग क्रमांक 8 मौला अल्ली दर्गा ते डोईफोडे दवाखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम खासदार निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 554902.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 554902.00/-

***काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षानी मापे नोंदली आहेत. जादा दराची निविदा मंजूर केली आहे. कामाचे ठिकाणी माहितीचा फलक लावला नाही.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | प्रभाग क्रमांक 8 मौला अल्ली दर्गा ते डोईफोडे |

| | | |
|---|---|---|
| | | दवाखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे |
| 2 | लेखाशिर्ष | खासदार निधी |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती सभा दिनांक 1/8/2012 ठराव क्रमांक 131 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | क-2393 दिनांक 6/9/2012 |
| 5 | निविदा रक्कम | रु. 463000 |
| 6 | ठेकेदाराचे नांव | मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा |
| 7 | कामाचा आदेश | 1132 दिनांक 6/3/2013 |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 11/3/2013 |
| 9 | कामाची मुदत | 30 दिवस |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 67- पान क्रमांक 55 ते 56 |
| 11 | प्रमाणक क्र. व दि. | 3044 दिनांक 29/3/2014 रु. 554902 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 127 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. कार्यारंभ आदेश दिनांक 6/3/2013 चा असून काम पूर्ण दिनांक 11/3/2013 रोजी झालेले आहे. मोजमाप नोंदवहीवर रेकॉर्ड एंट्रीच्या नोंदी दि. 14/3/2014 रोजी घेतलेल्या आहेत. काम पूर्ण झाल्यानंतमर एक वर्षानंतर मापे कशाच्या आधारे घेतलेली आहेत च तद्नंतर रक्कम प्रदान केली आहे. सर्व काम पूर्ण झाल्यानंतर डांबराखालील मापे कार्य आधारे घेतली ? दिनांक 10/1/2014 रोजी चाचणी अहवालासाठी नमुने पाठविण्यात आले आहेत. दि. 18/1/2014 रोजी चाचणी अहवाल प्राप्त झाला आहे. सदर बाबीमुळे कामाबाबत साशंकता निर्माण होते.

2. मे. रजिया कन्स्ट्रक्शन यांची निविदा 14.50% जादा दराने मंजूर करण्यात आली आहे. नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील अट क्रमांक 45 अनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात अशा सुचना असूनही तशी कार्यवाही केली नसल्याने नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे.

3. मा. जिल्हाधिकारी सातारा यांच्या प्रशासकीय मान्यता आदेश क्र.नियोजन/खास्थविका/2012-13/प्रमा/सातारा/का-4/41 ते 51 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय सातारा दि. 18/12/2012 मधील अट क्रमांक 16 नुसार कामाचे दर्शनी भागावर कामाचे नांव, मा. खासदारांचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, काम सुरु झाल्याचा दिनांक कामावरील प्रत्यक्ष खर्च व काम पुर्णत्वाचा दिनांक इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील असे नमूद असूनही त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

## *26 जुना वार्ड क्र. 23 ते 26 ते 28 ते 33 मधील रस्ते पिर्चींग करणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : रस्ते निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 488500.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 488500.00/-

***पुनर्प्रत्यायी आदेश दिले आहेत.मोजमापे एक वर्षांनी नोंदली आहेत.ठेकेदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीचे नांव पूर्णत्वाचा दाखल्यावर आहे.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | जुना वार्ड क्र. 23 ते 26 ते 28 ते 33 मधील रस्ते पिर्चींग करणे |
| 2 | लेखाशिर्ष | रस्ते निधी |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती सभा ठराव -138 दिनांक 16/5/2012 |
| 4 | निविदा रक्कम | 500000 |
| 5 | ठेकेदाराचे नांव | रणजीत अरुण घोरपडे |
| 6 | कामाचा आदेश | 104 दिनांक 27/5/2012 |
| 7 | काम पूर्ण दिनांक | 20/6/2012 |
| 8 | कामाची मुदत | 30 दिवस |
| 9 | मोजमाप नोंदवही क्र. | 59 पान क्रमांक 205 |
| 10 | प्रमाणक क्र. व दि. | 535 दिनांक 10/6/2013 रक्कम रु. 488500/- final |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 128 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठी दै. सकाळ दिनांक 24/7/2009 मध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. प्राप्त तीन निविदांपैकी श्री . रणजीत अरुण घारेपडे यांची 4.99% जादा दराची सर्वात कमी दर असल्याने सर्वसाधारण सभा दि. 31/8/2009 ठराव क्रमांक 775 ने निविदेस मंजूरी दिलेली आहे. त्याआधारे कार्यादेश देण्यात आला आहे. महराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांसख-2008/प्रक्र.256/08/उद्योग 4 दि. 10 ऑक्टोबर 2008 अनुसार सर्व साधारणतः कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकरणाच्या मते करारास, मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन

कार्यनियमावली नुसार संबंधीत विभागासी सल्ला मसलत केल्यानंतरच योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार कार्यवाही न करता नियमबाहयपणे दिनांक 27/5/2012 रोजी पुनर्प्रत्ययी आदेश दिले आहेत.

2. काम पूर्ण दिनांक 20/6/2012 रोजी झाले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 180 अनुसार मोजमाप पुस्तकावर काम जसे पूर्ण होत जाईल त्याप्रमाणे रेकॉर्ड एंन्ट्रीच्या नोंदी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता काम पूर्ण झाल्यानंतर म्हणजे जवळजवळ एक वर्षांनी मापे नोंदविली आहेत व रक्कम प्रदान केली आहे. काम दिनांक 20/6/2012 रोजी पूर्ण झाल्यानंतर पावसाळा कालावधी संपल्यानंतर 15/5/2013 रोजी मापे नोंद केली आहेत याबाबत साधार खुलासा करावा. देयक दिनांक 10/5/2013 रोजी तयार करण्यात आलेले आहे. मोजमाप पुस्तकात R.E. नोंद करण्यापूर्वी देयक नियमबाहयपणे तयार करण्यात आले आहे.

3. सदर कामाचे ठेकेदार हे रणजित अरुण घोरपडे हे आहेत. तथापि काम पूर्णत्वाचा दाखल्यावर (नमुना नं. 133) श्री. राजन शिवाजी खराडे असे नमूद आहे. विसंगती बाबत स्पष्टीकरण करावे.

[illegible] (Para No : 31, [illegible] No : 128)

## 27 वॉर्ड क्रमांक 22 पेठ भवानी सोमवार यादोगोपाळ अंतर्गत रस्ते डांबरी पॅचींग करणे

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : रस्ते न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 154551.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 153005.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1546.00/-

***पुनर्प्रत्यायी आदेश देण्यात आले आहेत. दंड वसूली केली नाही मोजमापे एक वर्षांनी नोंदली आहेत.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | वॉर्ड क्रमांक 22 पेठ भवानी सोमवार यादोगोपाळ अंतर्गत रस्ते डांबरी पॅचींग करणे |
| 2 | लेखाशिर्ष | रस्ते दुरुस्ती |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 188 दि. 24/6/2011 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | 1839 दिनांक 16/8/2011 |
| 5 | निविदा रक्कम | 150000/- |
| 6 | ठेकेदाराचे नांव | रणजीत अरुण घोरपडे |
| 7 | कामाचा आदेश | 17/10/2011 |

| | | |
|---|---|---|
| 8 | काम पूर्ण दिनांक | 16/6/2012 |
| 9 | कामाची मुदत | 30 दिवस |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 57 पान क्रमांक 99 ते 101 |
| 11 | प्रमाणक क्र. व दि. | 859 दिनांक 6/7/2013 रुपये - 154551 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 129 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठी दै. सकाळ दिनांक 24/7/2009 मध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. प्राप्त तीन निविदांपैकी श्री . रणजीत अरुण घारेपडे यांची 4.99% जादा दराची सर्वात कमी दर असल्याने सर्वसाधारण सभा दि. 31/8/2009 ठराव क्रमांक 775 ने निविदेस मंजूरी दिलेली आहे. त्याआधारे कार्यादेश देण्यात आला आहे. महराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांसख-2008/प्रक्र.256/08/उद्योग 4 दि. 10 ऑक्टोबर 2008 अनुसार सर्व साधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकरणाच्या मते करारास, मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावली नुसार संबंधीत विभागासी सल्ला मसलत केल्यानंतरच योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार कार्यवाही न करता नियमबाह्यपणे दिनांक 17/10/2011 रोजी पुनर्प्रत्ययी आदेश दिले आहेत.

2. श्री. रणजीत अरुण घोरपडे यांनी कामाचा आदेश दिनांक 17/10/2011 रोजी देण्यात आला. कामाची मुदत 30 दिवस होती. काम दि. 16/6/2012 रोजी पूर्ण झाले आहे. मुदतीत काम पूर्ण झाले नसून कामास मुदतवाढ घेतलेली नाही. अथवा दंड वसूल केलेला नाही. निविदा शर्त क्रमांक 2 अनुसार कामात योग्य प्रगती राहण्याकरीता 1% ते 10% दंडाची तरतूद करण्यात आली आहे. काम मुदतीत पूर्ण न झाल्याने 1% प्रमाणे रु. 1546 वसुल करणे आवश्यक होते. तथापि दंड वसूली नाही. वसूली करुन पुर्तता दाखवावी.

3. काम पूर्ण दिनांक 16/6/2012 रोजी झाले असून नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 180 नुसार काम जसजसे पूर्ण होईल त्याप्रमाणे रेकॉर्ड एंन्ट्री घेणे आवश्यक आहे. तथापि तसे न करता काम पूर्ण झाल्यावर जवळजवळ एक वर्षानी म्हणजे दिनांक 27/5/2013 रोजी मापे घेण्यात आली. काम पूर्ण झाल्यानंतर

पावसाळा कालावधी संपून गेल्यानंतर मापे घेण्यात आली आहेत याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

DATRDSM6601 (Ref No : 82, Hmm No : 129)

***28 प्रभाग क्रमांक 6 पेठ मंगळवार गवई विठ्ठल मंदीर ते सोहनीची गिरणी ते राजाज्ञे चौक अखेर डांबरीकरण करणे***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

नगरपरिषद सातारा

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : बांधकाम शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1688466.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 483116.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 1205350.00/-

***प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता यामध्ये फरक आहे कमी कालावधीची निविदा प्रक्रिया प्रशासकीय मान्यतेशिवाय रक्कम रु 204236 खर्च केला आहे***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | प्रभाग क्रमांक 6 पेठ मंगळवार गवई विठ्ठल मंदीर ते सोहनीची गिरणी ते राजाज्ञे चौक अखेर डांबरीकरण करणे |
| 2 | लेखाशिर्ष | बांधकाम |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | मा.जिल्हाधिकारी सातारा क्र.नियोजन/खास्थाविका/2012-13/प्रमा/सातारा/का-4/36 ते 39 दिनांक 7/11/2012 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | मा. कार्यकारी अभियंता,मजीप्राबांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/तांमं/2542/2012 दिनांक 10/8/2012 |
| 5 | निविदा रक्कम | 500000/- |
| 6 | ठेकेदाराचे नांव | मे रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा |
| 7 | कामाचा आदेश | क्र.सातारा/साबा/926 दि. 5/2/2013 |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 10/5/2013 |
| 9 | मोजमाप नोंदवही क्र. | 58 |
| 10 | प्रमाणक क्र. व दि. | 537-10/6/2013 रक्कम रु. 1688466 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 130 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. प्रशासकीय मान्यता दिनांक 7/11/2012 चे आदेशान्वये दिली असून ती रक्कम रु. 500000 ला दिली आहे. तथापि तांत्रिक मंजूरी मात्र रु. 1361620 इतक्या रकमेची आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 162 अनुसार ज्या प्राथमिक अंदाजांना प्रशासनीक मंजूरी घेण्यात आली होती. त्यापेक्षा असे अंदाज 10% पेक्षा अधिक असतील तेव्हा अंतिम अंदाजाच्या रकमेनुसार नियम 160 अन्वये मंजूरी

देणा-या सक्षम अधिका-याकडून नव्याने प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. असे आदेश आहेत. तथापि तशी मंजूरी घेण्यात आली नाही.

2. प्रशासकीय मान्यता मधील अट क्रमांक 6 नुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च करु नये अशी अट असतांनाही जादा खर्च रु. 1188466 इतका केला आहे. मंजूरीशिवाय केलेला नियमबाहय खर्च अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

3. सदर कामाची निविदा दै. पुढारी या वृत्तपत्रात दि. 1/12/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा स्वीक.ती दि. 12/12/2012 आहे. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस1088/(2512)/उद्योग 6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 अनुसार निविदाकारास निविदा भरण्यास कमीतकमी तीन आठवडे कालावधी देणे आवश्यक असतांना कमी कालावधी देण्यात आलेला आहे त्यामुळे निविदेस योग्य ती प्रसिध्दी मिळाली नसल्याने जादा दराची निविदा प्राप्त होऊन जादा खर्च करावा लागला आहे.

4. खर्चाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मूळ अंदाजपत्रक | 1290635 |
| निविदा 15% जादा मंजूरी | 193595 |
| खर्च आवश्यक | 1484230 |
| प्रत्यक्ष खर्च | 1688466 |
| जादा खर्च | 204236 |

जादा खर्च रुपये 204236 मंजूरीशिवाय करण्यात आला आहे.

5. निविदा शर्त क्रमांक 2 नुसार कामात योग्य प्रगती राहीली नाही तर एक ते दहा टक्के पर्यंत दंड करण्याची तरतूद आहे. सदर कामाची मुदत 60 दिवस असून ते विहीत मुदतीत पूर्ण झाले नसल्याने एक टक्के प्रमाणे रुपये 16884 दंड वसूली करणे आवश्यक आहे.

DATDNSM5901 (Ref No : 83, Hmm No : 130)

## *29 पेठ गुरुवार सि.स.नं. 271/272 येथे गेट बसविणे व ग्रीलवर्क करणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : बांधकाम न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 428507.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 277624.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 150883.00/-

***1. ग्रीलची तरतूद नसतांना काम करुनही सुधारीत मंजूरी घेण्यात आली नाही.2. दर पृथ्थकरण मध्ये ग्रीलचा समावेश नाही.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | पेठ गुरुवार सि.स.नं. 271/272 येथे गेट बसविणे व ग्रीलवर्क करणे. |
| 2 | लेखाशिर्ष | बांधकाम |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती सभा दि. 18/1/2014 ठराव क्रमांक 1042 |
| 4 | निविदा रक्कम | 402532 |
| 5 | ठेकेदाराचे नांव | चेअरमन साईश मजूर सहकारी संस्था लि. सातारा |
| 6 | कामाचा आदेश | सानप/साबां/2250 दि. 24/2/2014 |
| 7 | काम पूर्ण दिनांक | 10/3/2014 |
| 8 | मोजमाप नोंदवही क्र. | 68 |
| 9 | प्रमाणक क्र. व दि. | 2973 दिनांक 20/3/2014 रक्कम रु. 428507/- |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 131 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. मूळ अंदाजपत्रक पहाता त्यामध्ये Structured Steel Gate ची 17.66 वर्गमीटर कामाची तरतूद आहे. तथापी प्रत्यक्ष काम खालीलप्रमाणे केले आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण |
|---|---|---|
| 1 | Gate | 12.25 वर्गमीटर |
| 2 | Grill | 13.54 वर्गमीटर |

ग्रीलची तरतूद नसतांना सदर काम केले असून दर रु. 11143.50 प्रमाणे रु. 150883 इतकी रक्कम अदा केली आहे.

अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील 160 अनुसार सुधारीत मंजूरी घेणे आवश्यक असतांना तशी मंजूरी घेतली नाही. सबब रक्कम रु. 150883 वसुल करावी

2. अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसलेल्या दराचे पृथ्थकरण केलेले नसतानाही प्रदानाचा दर निश्चित न करता रक्कम आदा केली आहे. त्यामुळे योग्य दराची खात्री होत नाही. दर पृथ्थकरणाआधारे पुर्तता दाखवावी.

3. निविदा रकम रु. 402532 असून खर्च मात्र रु. 428507 केलेला आहे. निविदा रकमेपेक्षा जादा खर्च नियमबाहयपणे केला आहे.

नगरपरिषद सातारा

## 30 सदर बाझार डॉ. लिमये हॉस्पीटल ते घेवारी हॉस्पीटल प्लॉट नं. 32 अखेर रस्ता डांबरीकरण करणे

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम खासदार निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 627492.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 462914.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 164578.00/-

***1. कामाच्या बदलास महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 162 अनुसार मंजूरी घेण्यात आली नाही***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | सदर बाझार डॉ. लिमये हॉस्पीटल ते घेवारी हॉस्पीटल प्लॉट नं. 32 अखेर रस्ता डांबरीकरण करणे |
| 2 | लेखाशिर्ष | बाधकाम |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | जिल्हाधिकारी सातारा नियोजन/खास्थाविका/2012-13/प्रशासकीयमान्यता साताराका-4/76 ते 93 दि. 16/3/2013 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | मा. कार्यकारी अभियंता मजी/प्राबांधकाम विभागसातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/तांमं/184/2012 दिनांक 24/1/2013 |
| 5 | निविदा रक्कम | 462000 |
| 6 | ठेकेदाराचे नांव | मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा |
| 7 | कामाचा आदेश | सानप/सांबा/1134 दिनांक 2/8/2013 |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 25/10/2013 |
| 9 | मोजमाप नोंदवही क्र. | 54 |
| 10 | प्रमाणक क्र. व दि. | 3044 दिनांक 29/3/2014 रु. 627492 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 133 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. मूळ अंदाजपत्रकानुसार 363 मीटर लांबीचा रस्ता करण्याची तरतूद होती. त्यानुसार लांबी 363 मीटर व रुंदी 4.20 मीटर अशी एकूण 1524.60 वर्ग मीटर रस्ता करणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्ष 1968.41 वर्ग मीटर रस्त्याचे काम केले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 162 अनुसार

सुधारीत मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापि तशी मंजूरी न घेता रक्कम आदा केलेली असल्याने मंजूरीशिवाय झालेला जादा खर्च रु. 164578 अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

[illegible] (Re. No : 56, Item No : 133)

## *31 आदालत वाडा ते शंकराचार्य मठ ते माऊली मंदीर कमान अखेर रस्ता डांबरीकरण करणे व संरक्षक भिंत बांधणे*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : खासदार निधी खासदार निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 974758.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 965010.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 9748.00/-

***काम विलंबाने पूर्ण केले आहे तथापि दंड वसूल नाही. प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्च केलेला आहे. कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावलेला नाही. निविदेस कमी मुदत दिली आहे.***

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | आदालत वाडा ते शंकराचार्य मठ ते माऊली मंदीर कमान अखेर रस्ता डांबरीकरण करणे व संरक्षक भिंत बांधणे |
| 2 | लेखाशिर्ष | खासदार निधी |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | मा.जिल्हाधिकारी, सातारा क्र. नियोजन/खास्थाविका/2010-11/प्रमा/सातारा/का4/26 दिनांक 7/7/2011 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | मा.कार्यकारी अभियंता मजीप्रा बांधकाम विभाग,सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/तांमं/1288/11 दिनांक 13/6/2011 |
| 5 | निविदा रक्कम | 945200 |
| 6 | ठेकेदाराचे नांव | मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा |
| 7 | कामाचा आदेश | 18/8/2011 |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 10/5/2013 |
| 9 | कामाची मुदत | 60 दिवस |
| 10 | मोजमाप नोंदवही क्र. | 58 |

| | | |
|---|---|---|
| 11 | प्रमाणक क्र. व दि. | 627 दिनांक 19/6/2013 रु. 974758 |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 134 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. प्रशासकीय मान्यता दिनांक 7/7/2011 अनुसार दिली असून त्यामधील अट क्रमांक 3 अनुसार कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे मंजूर काम मंजूरीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तथापि काम पूर्ण होण्यास एक वर्ष नऊ महिने कालावधी झाला आहे. यास्तव निविदा शर्त क्र. 2 अनुसार काम वेळेत पूर्ण न झाल्यास 1% ते 10% पर्यंत दंडाची तरतूद आहे. यास्तव 1 टक्के प्रमाणे दंड रु. 9748 दंड वसूली करुन पुर्तता दाखवावी.

2. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 945200 चे असून प्रशासकीय मान्यता मधील अट क्र. 6 नुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च खर्च करु नये असे नमूद असतांनाही रक्कम रु. 974758 खर्च केला आहे.

3. प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 16 नुसार कामाचे दर्शनी भागात मा. खासदार यांचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, काम सुरु झाल्याचा दिनाक, कामावरील प्रत्यक्ष खर्च, काम पूर्ण दिनांक इत्यादी तपशिल दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहिल तथापि तशी कार्यवाही केली नाही.

4. सदर कामाची निविदा दै. पुढारी या वृत्तपत्रात दि. 17/6/2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा स्वीकृती दि. 30/6/2011 आहे. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस1088/(2512)/उद्योग 6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 अनुसार निविदाकारास निविदा भरण्यास कमीतकमी तीन आठवडे कालावधी देणे आवश्यक असतांना कमी कालावधी देण्यात आलेला आहे त्यामुळे निविदेस योग्य ती प्रसिध्दी मिळाली नसल्याने जादा दराची निविदा प्राप्त होऊन जादा खर्च करावा लागला आहे.

DATDNSM5901 (Ref No : 87, Hmm No : 134)

## *32 वॉर्ड नं. 3 रामकृष्ण कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 रस्ते निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

**गुंतलेली रक्कम रु. 520605.00 /-**

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 472577.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 48028.00/-

नगरपरिषद सातारा

*1. कमी मुदतीत निविदा प्रसिध्द केली आहे.2. निविदेसोबत साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडलेली नाहीत.3. अंदाजपत्रकातील बदलास मान्यता घेण्यात आलेली नाही.4. देयकातून 1% प्रमाणे कामगार कल्याण उपकर कपात केलेली नाही.*

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नाव | वॉर्ड नं. 3 रामकृष्ण कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे. |
| 2 | लेखाशिर्ष | रस्ते निधी |
| 3 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 160 दिनांक 18/6/2012 |
| 4 | तांत्रिक मंजूरी | मा. कार्यकारी अभियंता, मजीप्रा बांधकाम विभाग सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/तांमं/2406 दि. 7/9/2012 |
| 5 | निविदा रक्कम | 500000 |
| 6 | ठेकेदाराचे नांव | श्री. तुकाराम दिगंबर सुतार |
| 7 | कामाचा आदेश | क्र. सानप/साबां/1136 दि. 6/3/2013 |
| 8 | काम पूर्ण दिनांक | 14/3/2013 |
| 9 | मोजमाप नोंदवही क्र. | 50 |
| 10 | प्रमाणक क्र. व दि. | 858 दि. 9/7/2013 रु. 520605 Ist and Final |

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 135 दि. 10/08/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. सदर कामाची निविदा/जाहिरात दै. तरुण भारत या वृत्तपत्रात दि. 17/12/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा स्वीकृती दि. 21/12/2012 आहे. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस1088/(2512)/उद्योग 6 दिनांक 2/11/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 अनुसार निविदाकारास निविदा भरण्यास कमीतकमी तीन आठवडे कालावधी देणे आवश्यक असतांना कमी कालावधी देण्यात आलेला आहे त्यामुळे निविदेस योग्य ती प्रसिध्दी मिळाली नसल्याने जादा दराची निविदा प्राप्त होऊन जादा खर्च करावा लागला आहे.

2. लिफाफा क्र. 1 तांत्रिक लिफाफा असून त्यामधील PAN CARD नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे साक्षांकित केलेली नाहीत. त्यामुळे सत्यतेबाबत पडताळणी करता येत नाही.

3. खालील बाबी मूळ अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नाहीत. त्या Extra Item म्हणून नोंदल्या आहेत.

| | परिमाण | दर | एकूण |
|---|---|---|---|
| i)Excavation for Road way in earth soil | 161.59 | 133.98 | 21649 |
| ii)Disposal of Excavation Material. | 161.59 | 131.08 | 21173 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | एकूण | 42822 |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1951 नियम 167(1) अनुसारर मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे मान्यता देण्याच्या प्राधिका-याच्या मंजूरविना मूळ अंदाजपत्रकात काहीही बदल करण्यात येणार नाही व अशा फेरबदलास मंजूरी देण्यास सक्षम असलेल्या अधिका-याच्या स्वाक्षरीची मंजूर केलेला कोणताही फेरबदल अंदाजपत्रकात नमूद करण्यात आला पाहिजे अशी तरतूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. सबब केलेला खर्च रु. 42822 अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

4. महाराष्ट्र शासन अद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्रक्र108/कामगार 7अ दिनांक 17 जुन 2010 अनुसार देयकातून 1% प्रमाणे कामगार कल्याण उपकर कपात करुन कामगार कल्याण उपकर निधीत भरणा करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नसल्याने आता 1% रक्कम रु. 5206/- नस्तीवरुन भरणा करावेत.

DATDNSM5901 (Ref No : 88, Hmm No : 135)

## *33 जंतूनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10991800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10991800.00/-

***1. नियमबाहयपणे पुनर्प्रत्यायी आदेश दिला आहे.2.अंशत. प्रदान रकमा मंजुरीविना आदा केल्या आहेत.***

| अ क्र | प्र क्र | दिनांक | रक्कम | माल | पुरवठा | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 525 | 10.6.2013 | 15,00,000/- | SRB Cleaner | 750 | 111 | 83250 |
| 2 | 534 | 10.6.2013 | 15,08,450/- | किलेक्स पावडर | 15000 | 89 | 1335000 |
| | | | | सॅनिटोलीन | 750 | 325 | 243750 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लिक्वीड | | | |
| | | | | फिनोलीन सुपर फोर्ट | 750 | 111 | 128250 |
| | | | | हार्बो स्प्रे डिलक्स | 400 | 2768 | 1107200 |
| | | | | मलेरिया ऑईल | 1000 | 111 | 111000 |
| 3 | 1274 | 5.9.2013 | 10,00,000/- | SRB Cleaner | 500 | 111 | 55500 |
| 4 | 1276 | 5.9.2013 | 13,14,900/- | | | | |
| | | | | किलेक्स पावडर | 12000 | 89 | 1068000 |
| | | | | सॅनिटोलीन लिक्वीड | 500 | 325 | 162500 |
| | | | | फिनोलीन सुपर फोर्ट | 500 | 171 | 85500 |
| | | | | हार्बो स्प्रे डिलक्स | 300 | 768 | 830400 |
| | | | | मलेरिया ऑईल | 1000 | 13 | 113000 |
| 5 | 2064 | 4.12.2013 | 15,00,000/- | SRB Cleaner | 400 | 11 | 44400 |
| 6 | 2245 | 8.1.2014 | 18,13,400/- | | | | |
| | | | | किलेक्स पावडर | 12000 | 89 | 1068000 |
| | | | | सॅनिटोलीन लिक्वीड | 600 | 325 | 195000 |
| | | | | फिनोलीन सुपर फोर्ट | 400 | 171 | 68400 |
| | | | | हार्बो स्प्रे डिलक्स | 700 | 2768 | 1937600 |
| 7 | 2770 | 6.3.2014 | 23,55,050/- | SRB Cleaner | 500 | 325 | 162500 |
| | | | | किलेक्स पावडर | 550 | 171 | 94050 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सॅनिटोलीन लिक्वीड | 600 | 111 | 66000 |
| | | | | फिनोलीन सुपर फोर्ट | 13500 | 89 | 1201500 |
| | | | | हार्बो स्प्रे डिलक्स | 300 | 2768 | 830400 |
| | | एकूण | 1,09,91,800/- | | | | |

नगरपरिषदेने उपरोक्त प्रमाणकान्वये जंतुनाशके खरेदीसाठी खर्च केलेला आहे. सदर खर्चाचे लेखापरिक्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 46 दि. 27/4/2015 अन्वये संबंधीत संस्थेस खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. जंतुनाशके खरेदीसाठी सन 2009-10 मध्ये निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली होती. त्यानुसार मे. हर्बोमिन रिसर्च लॅबॉरेटरिज सोलापुर,याची निविदा मंजुरी झालेली होती. जनरल कौन्सील ठराव क्र 3 दि. 26-4-13 अनुसार उपरोक्त सन 2009-10 चे दर व पुरवठादाराकडुन सन 2013-14 मध्ये खरेदी करण्यास मंजुरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासन ,उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512) / उदयोग.6 दि. 2-1-92 मधील परीच्छेद क्रमांक 8.3 (परिशिष्ट 7) अनुसार निविदा प्रकियेस विलंब होत असल्यास पुनप्रत्यायी आदेश( Repeat order) देण्याबाबत तरतुद आहे. तथापि प्रस्तुत प्रकारची सन2009-10 नंतर 4 वर्षाचा कालावधी लोटलेला असुनही निविदा प्रकिया न राबविता सन 2009-10 चे निश्चित केलेले दरानुसार व पुरवठादार यांचेकडुन खरेदी केली आहे. सदर बाब शासन आदेशाचे उल्लंघन करणारी आहे. महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक भांखस-2008/प्र.क्र.256/08/उदयोग 4 दि. 10/10/2008 नुसार सर्वसाधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये तसेच अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधीकाऱ्याच्या मते करारास मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावलीअनुसार संबंधीत विभागाशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही करावी असे स्पष्ट नमूद असताना नगरपरिषदेने विभागाची परवानगी न घेता सन 2013-14 वर्षात रक्कम रु. 10991800/- खर्च केला आहे.

2. जन. कौन्सील ठराव क्र.3 दि .26-4-2013 नुसार सन 2009-10 चे दराने खरेदीस मंजुरी दिली आहे.तथापि पुरवठादाराकडुन सदर कालावधीत पुरवठा करण्याबाबत करारनामा घेतला नाही. तरीही पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

3. खालील प्रमाणकांच्या रकमा पूर्ण रकमेपैकी अंशत प्रदान आहे.

| अ क्र | प्र क्र | दिनांक | रक्कम | बिलाची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 525 | 10-6-2013 | 15,00,000/- | 3008450 |

नगरपरिषद सातारा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | 1274 | 5-9-2013 | 15,00,000/- | 2314900 |
| 3 | 2064 | 4-12-2013 | 15,00,000/- | 3313400 |

उपरोक्त रकमा पहाता बिलाच्या एकूण रकमेपैकी काही रकमा स्वतंत्र प्रमाणकाअन्वये आदा केल्या आहेत. महाराष्ट नगरपालिका लेखासंहीता 1971 चे नियम क्रमांक 17 अनुसार प्रदानार्थ मंजुरी आवश्यक आहे. तथापि उपरोक्त प्रमाणके पहाता त्यावर मंजुरी दाखल स्वाक्ष-या नाहीत. तरीही रकमा नियमबाहयपणे आदा केल्या आहेत.

4. सन 2009-10 च्या निविदा प्रक्रीयेस सन 2013-14 अखेर मुदतवाढ दिल्याने ईनिविदा पद्धतीचा अवलंब झाला नाही वास्तिव-कपणे महाराष्ट्र शासन सामान्य् प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती 2012/ प्र.क्र. 273/19 दि. 19/01/2013 अनुसार दि. 1 फेब्रुवारी 2013 पासून 10 लाखावरील खरेदीसाठी ई निविदा प्रक्रीयेचा अवलंब अनिवार्य करण्यात आलेला आहे तथापि नगरपालिकेने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब झालेला संपूर्ण खर्च रु. 10991800/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

***34 शासन परिपत्रक दि. 5 मे 2010 नुसार सुधारीत संरचनेनुसार वेतननिश्चिती न केलेबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर 1209/प्र.क्र.69 /सेवा9 दि. 5 मे 2010 मधील मुद्दा क्र. 2.5 मध्ये सुधारीत वेतनसंरचनेत वेतनवाढीची परिगणना करताना 10 च्या पटीत घेणेबाबत सूचना दिलेल्या असताना नगरपरिषदेने याबाबत वेतनवाढीची परिगणना तपासणी करुन अतिप्रदानाबाबत वसूलीची कार्यवाही केलेली नाही.***

लेखापरीक्षणाने अर्धसमासपत्र क्र. 65 दि. 11/05/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपाबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे उत्तर प्राप्त न झालेने खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक वित्तविभाग क्र. वेपुर1209/प्र.क्र.69 /सेवा 9 दि. 5 मे 2010 मधील मुद्दा क्र. 2.5 मध्ये सुधारीत वेतनसरचनेत वेतनवाढीची परिगणना करताना 10 च्या पटीत घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत तसेच

याबाबत सन 2011-12 मधील लेखापरीक्षण अहवालातही परिच्छेद क्र. 40 घेण्यात आलेला असताना संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांच्या सुधारीत वेतन निश्चिती करुन त्यानुसारच वेतन अदा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. उदाहरणादाखल जादा वेतन अदा होत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती खालीलप्रमाणे

| कर्मचाऱ्याचे नाव | देय वेतन जुलै 13 | अदा वेतन जुलै 13 | अतिप्रदान कालावधी |
|---|---|---|---|
| कल्पना कांबळे ( झाडू कामगार) | 7780+1300 | 7800+1300 | जुलै 06 पासून |
| सौ सारंगा कडाळे (झाडू कामगार) | 7630+1300 | 7650+1300 | जुलै 06 पासून |
| सुलोचना तुपे (सफाई कामगार) | 7630+1300 | 7650+1300 | जुलै 06 पासून |
| ताराबाई कांबळे (सफाई कामगार) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| भारती गायकवाड (सफाई कामगार) | 6970+1300 | 6990+1300 | जुलै 06 पासून |
| जितेंद्र वाघमारे (सफाई कामगार) | 7370+1300 | 7390+1300 | जुलै 06 पासून |
| रमेश आवळे (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| योगेश तारळेकर (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| यशवंत कांबळे (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| शैलेश गवई (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| संदीप नाना खरे (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| अनिल चौधरी (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| महेंद्र पवार (आरोग्य बिगारी) | 7360+1300 | 7370+1300 | जुलै 07 पासून |
| बाळू देडगे (वाहनचालक) | 9670+1900 | 9680+1900 | जुलै 08 पासून |

| | | | |
|---|---|---|---|
| कैलास सोळके (वाहनचालक) | 9670+1900 | 9680+1900 | जुलै 08 पासून |

वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची नावे ही उदाहरणादाखल असून उपरोक्त शासन परिपत्रकाप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची परिगणना तपासणे आवश्यक असून अतिप्रदानाबावत स्वतंत्र परिगणना करुन वसूली होणे आवश्यक आहे.

[illegible] (Ref No : 23, Form No : 65)

## *35 न्यायालयीन प्रकरणांबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 70000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 70000.00/-

***कायदेसल्लागार मंडळाची फि निश्चितीबाबत मंजूरी घेतलेली नाही. नोंदवही साक्षांकित केलेली नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र 77 .दि 2015/05/16 .अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही नमूद आक्षेप खालीलप्रमाणे त्यामुळे . .आहे येत करणेत

1) नगरपालिका सातारा यांनी सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12 दि. 26/04/2013 अन्वये नगरपालिकेने एकूण 20 वकीलांची कायदे सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली आहे.

सदर नेमणुका करतांना नगरपालिकेने संबंधीत वकीलाचीं शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, या क्षेत्रातील अनुभव आदींबाबत अभिलेखे प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना याबाबत कार्यवाही केलेली दिसत नाही. वकीलांची कायदे सल्लागार म्हणून नियुक्ती करतांना नगरपालिकेने कोणत्या प्राधिकारान्वये व कोणत्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे याबाबत साधार पुर्तता करावी.

2) तसेच कायदे सल्लागार म्हणून नियुक्ती केल्यानंतर संबंधितांना न्यायालयीन कामकाजासाठी खालीलप्रमाणे फि ठरविली आहे.

| | |
|---|---|
| घरपट्टी संबंधी अपिले | प्रत्येकी 1000/- |
| डिले हाऊस टॅक्स अपिले | प्रत्येकी 1000/- |
| रिव्हीजन हाऊस टॅक्स अपिले | प्रत्येकी 1500/- |

नगरपरिषद सातारा

| कॅव्हेट | प्रत्येकी 1200/- |
|---|---|
| क्लास फोर चौकशी कामी | 2000/- |
| क्लास थ्री चौकशी कामी | 3000/- |
| दिवाणी दावे | 2000/- |
| कामगार विषयक | 1500/- |

तसेच प्रमाणक क्रमांक (2)(1)2830दिनांक अपिले टॅक्स हाऊस -/16500 .रु 2015/03/11

अडव्हान्स दिले.

प्रमाणक क्रमांक (2 व 1)2831दिनांक धनंजय शैलेश ॲड -/70000 .रु 2014/03/11

चव्हाण हायकोर्ट वकील जनहित याचिका खर्च करीता 2014/517 पिटीशन क्रिमीनल 2013/80

केलेला आहे.

3) नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम क्र. 121 नुसार नगरपालिकेने नमुना नं. 90 नोंदवही ठेवलेली आहे. परंतु सदर नोंदवहीतील रकाने क्र. 1 ते 21 मधील माहितीच्या नोंदी सविस्तर घेतलेल्या नाहीत.

4) नोंदवही नोंदी मुख्याधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत.

उपरोक्त बाबत साधार पुर्तता करावी.

DATSPVM7601 (Ref No : 32, Hmm No : 77)

## *36 वाहन वापरावरील जादा झालेल्या खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 103954.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 958.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 102996.00/-

***नगररिषद सातारा सन 2013-14 मध्ये वाहन क्र. एम एच 11 एबी 1001 ची लॉगबुक व हिस्ट्रीशीटची इंधन व दुरुस्ती खर्च पडताळता स्थायी निर्देश क्र. 31 व 32 नुसार इंधन व दुरुस्ती खर्चाची मर्यादा देण्यात आली असून मर्यादेपेक्षा जादा खर्च झालेला आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 83 दिनांक 22/5/2015 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्रमांक नप्रस/वाहन धोरण/201/2005/प्रक्र05/9 दि. 10 मे 2005

तसेच नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्रमांक 32 मधील अ.क्र. 16 नुसार अध्यक्ष, मुख्याधिकारी यांना नगरपालिकेने उपलब्ध करेन दिलेल्या वाहनाच्या देखभाल दुरुस्तीसाठी व वाहन सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रक्कम रुपये 25000/- पर्यंत खर्च करण्याची मर्यादा घालून दिलेली असतांना नगरपालिकेने वाहन देखभाल दुरुस्ती करीता खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | सन 2013-14 देखभाल दुरुस्तीचा खर्च | खर्चाची वार्षिक मर्यादा | जादा खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | एम.एच.11 एबी 1001 | 73931 | 25000 | 48931 |
| | एकूण | 73931 | 25000 | 48931 |

नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्रमांक 32 मधील अनुक्रमांक 17 नुसार मर्यादेपेक्षा जादा होणारा खर्च वाहन वापरणा-या प्राधिका-याने स्वत: सोसावयाचा आहे. यास्तव मर्यादेपेक्षा जादा झालेल्या खर्चाची रक्कम रुपये 48931/- संबंधीतांकडून वसूल करावी. तोपर्यंत सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) नगरपरिषद संचालनालयाचे सुधारणा परिपत्रक क्रमांक नप्रस/वाहन धोरण/2005 प्र.क्र.05/09 दि.18/8/2005, दि. 29 ऑगस्ट 2005 व दि. 3 मे 2006 तसेच स्थायी निदेश क्रमांक 32 मधील अ.क्र. 7(2)नुसार आस्थापना खर्च 40% पेक्षा कमी असणा-या "अ" वर्ग नगरपालिकेच्या अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचया अखत्यारीतील प्रत्येक वाहनासाठी इंधनाची (पेट्रोल) खर्चाची मर्यादा प्रतिमाह 100 लिटर इतकी ठरवून दिलेली असतांना नगरपालिकेनी सन 2013/2014 मध्ये खालील प्रमाणे इंधन वापरले आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | सन 2013-14 मध्ये खरेदी इंधन (लिटर) | इंधन वापराची वार्षिक मर्यादा लिटर्स | जादा वापरलेले इंधन (लिटर) |
|---|---|---|---|---|
| 1 | एम.एच.11 ए.बी.1001 | 1877 लीटर | 1200लिटर | 677 लिटर |
| | एकूण | 1877 लीटर | 1200लिटर | 677 लिटर |

तरी उपरोक्त प्रमाणे सन 2013-14 मध्ये विहीत मर्यादेपेक्षा एकूण 677 लि. जादा पेट्रोल वापरले असल्याचे दिसून येते. सबब स्थायी निदेश क्रमांक 32 अ.क्र. 7अ नुसार विहीत मर्यादेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास म्हणजेच 677 लिटर दर 79.86= 54065 रु ला विभागिय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे इंधनावर जास्त झालेला खर्च रक्कम रु. 54065 वसूलात आणून पुर्तता दाखवावी.

3) स्थायी निदेश क्रमांक 32 अ.क्र. 18 नुसार जिल्हया बाहेरील दौ-यासाठी वाहन वापरण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद केलेले असतांना सदरचे वाहनाचा जिल्हयाबाहेर वापर करण्यात आलेला आहे. याबाबत सक्षम प्राधिका-याची मान्यता सादर करावी तोपर्यंत सदर प्रमाणक क्रमांक 3013 दिनांक 27/3/2014 रक्कम रु. 958/- हा खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) स्थायी निदेश क्र. 32 अ.क्र. 17 नुसार खर्च मर्यादेपेक्षा जास्त होणारा खर्च वाहन वापरणा-या अधिका-याने स्वत: सोसावा असे नमूद असल्याने देखभाल दुरुस्तीवरील जादा खर्च रु. 48931 व इंधनावरील जादा खर्च रु. 54065/- असा एकूण रक्कम रु. 102996 संबंधीतांकडून वसुलात आणुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी. व इंधन खर्च रक्कम रु. 958 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.